निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

## निजामपूर-जैताणे
## ता. साक्री जि. धुळे

* नॅक प्रमाणित *

आदर्श कला महाविद्यालय निजामपूर - जैताणे
ज्ञान दीप
तमसोऽ मा ज्योतिर्गमय




# ज्ञानदीप

वार्षिक नियतकालिक - २०१६-२०१७

# आदर्श कला महाविद्यालय

**निजामपूर - जैताणे ता. साक्री जि. धुळे**

*** नॅक पुर्नप्रमाणित ***

# ज्ञानदिप

**वार्षिक नियतकालिक**

**२०१६-१७**


**संपादक**

**डॉ. सुधाकर एल. जाधव**

**सदस्य**

**डॉ. विजय ग. गुरव**

**सदस्य**

**डॉ. रविंद्र पी. ठाकरे**

**सदस्य**

**प्रियंका पी. सुलाखे**

प्रकाशन स्थळ :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

प्रकाशन काळ :- वार्षिक

प्रकाशक :- प्राचार्य डॉ. अशोक पी. खैरनार

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

संपादक :- डॉ. सुधाकर एल. जाधव

राष्ट्रीयत्व :- भारतीय

पत्ता :- आदर्श कला महाविद्यालय निजामपूर-जैताणे,
ता. साक्री जि. धुळे

मुद्रक :- ऋद्र क्रिएशन्स,
माणिक चौक, शिरीष कुमार स्मारक समोर,
नंदुरबार ता.जि. नंदुरबार. मो. ९८२३७२४७०५


(सदर अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

## ❋ सन्माननीय सदस्य ❋

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | अध्यक्ष |
| २) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, वरीष्ठ महाविद्यालय |
| ३) | मा.भाईसो. श्री. सुहास विष्णूदास शाह | - | उपाध्यक्ष |
| ४) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष, शालेय समिती |
| ५) | मा.दादासो. श्री. बारीक यादव पगारे | - | सदस्य |
| ६) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | खजिनदार |
| ७) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सचिव |
| ८) | मा.भाईसो. श्री. किशोर शांतिलाल शाह | - | सहसचिव |
| ९) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| १०) | मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ११) | मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी | - | सदस्य |
| १२) | मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे | - | सदस्य |

# आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे

## ❁ सन्माननीय सदस्य ❁

| अ.क्र. | सन्मानीय सदस्यांचे नांव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १) | मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह | - | अध्यक्ष |
| २) | मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील | - | सदस्य |
| ३) | मा.भाईसो. श्री. नितीनकुमार मणिलाल शाह | - | सदस्य |
| ४) | मा.नानासो. श्री. दत्तात्रय जगन्नाथ वाणी | - | सदस्य |
| ५) | मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह | - | सदस्य |
| ६) | मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब | - | सदस्य |
| ७) | मा.प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार | - | सचिव |

निजामपूर–जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर–जैताणे ता. साक्री जि. धुळे

❊ नॅक पुर्नप्रमाणित ❊

**❊ आमचे श्रद्धास्थान ❊**

अध्यक्ष – निजामपूर–जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.काकासो.श्री. दशरथ नारायण पाटील**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

* नॅक पुर्नप्रमाणित *

*** आमचे प्रेरणास्थान ***

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे



**मा.बाबासो.ॲड.श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# आदर्श कला महाविद्यालय

निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

* नॅक पुर्नप्रमाणित *



प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

# निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननिय पदाधिकारी

### निजामपूर-जैताणे ता. साक्री जि. धुळे

अध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.काकासो. श्री. दशरथ नारायण पाटील**

अध्यक्ष - आदर्श कला महाविद्यालय
सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.बाबासो. श्री. शरदचंद्र जगन्नाथ शाह**

उपाध्यक्ष - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. सुहास विष्णुदास शाह**

अध्यक्ष, शालेय समिती निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. अजितचंद्र जगन्नाथ शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. बारीक**
**यादव पगारे**

खजिनदार निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.नानासो. श्री. दत्तात्रय**
**जगन्नाथ वाणी**

सचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.भाईसो. श्री. नितीनकुमार**
**मणिलाल शाह**

सहसचिव - निजामपूर-जैताणे शिक्षण
प्रसारक मंडळ



**मा.भाईसो. श्री. किशोर**
**शांतीलाल शाह**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ
सदस्य - आदर्श कला महाविद्यालय



**मा.श्री. विठ्ठलराय राजेश्वर उपासनी साहेब**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राजेंद्र जगन्नाथ वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.आप्पासो. श्री. राजेंद्र मुरलीधर वाणी**

सदस्य - निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळ



**मा.दादासो. श्री. राघो बळीराम पगारे**

# महाविद्यालय विकास समिती सदस्य



डॉ. सुधाकर लो. जाधव
(सदस्य)



डॉ. रविन्द्र पो. ठाकरे
(सदस्य)



प्रा. कांतीलाल दा. सोनवणे
(सदस्य)



डॉ. विजय ग. गुरव
(सदस्य)



श्री. अशोक द. खैरनार
(सदस्य)



प्रा. आतिश मेश्राम
(सदस्य)



डॉ. प्रियंका पी. सुलाखे
(सदस्य)



सौ. छाया बळीराम अहिरे
(सदस्य)

# प्राचार्यांचे मनोगत

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा **"ज्ञानदीप"** नियतकालिक अंक आपल्या हाती सुपूर्त करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विविध विषयावर कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना अधिक ज्ञान मिळावे यासाठी विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या दृष्टीकोनातून "सांस्कृतिक कार्यक्रम" व "युवारंग" सारखे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवने महाविद्यालयाला Academic Audit मध्ये 'A' Grade बहाल केले. याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे.

ज्ञानाबरोबर श्रमाचे महत्त्व रूजावे म्हणून आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०० तास स्वच्छता मोहीम यशस्वीतेने राबविली व समाजसेवेचा वसा घेतला. विद्यार्थ्यांमधील साहित्यिक विकसीत व्हावेत, त्यांना लेखनाची आवड निर्माण व्हावी, त्यांची सृजनशीलता जपावी यासाठी **"ज्ञानदीप"** चा अंक प्रकाशित केला जातो. त्यात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता, कथा, वैचारिक लेख व संकलित लेख यांचा समावेश आहे. विद्यार्थी लेखकांचे अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा. **"ज्ञानदीप"** तयार करतांना मा. व्यवस्थापन मंडळ नि.जै. शिक्षण प्रसारक मंडळ आदर्श कला महाविद्यालय व्यवस्थापन समितीची प्रेरणा व महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक बंधू-भगिनींचे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.

धन्यवाद!

**प्रा.डॉ.अशोक पी. खैरनार**
प्राचार्य
आदर्श कला महाविद्यालय
निजामपूर-जैताणे

*****

# संपादकीय....

प्रिय वाचक मित्र हो,

सन २०१६-१७ चा वार्षिक **ज्ञानदीप** नियतकालीकाचा विलोभनीय अंक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. प्रस्तुत अंक म्हणजे आदर्श महाविद्यालयाचे दर्शन घडविणारा आरसाच होय. या अंकात महाविद्यालयाचे प्राध्यापक, विध्यार्थी व इतर घटकांचे प्रतिबिबं आपणास दिसेल.

आदर्श महाविद्यालय म्हणजे माळमाथा परिसरात उच्च शिक्षण देणारे एकमेव दालन होय. ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना साहित्य आणि कलेचे शिक्षण देउन स्पर्धेच्या युगात सक्षम करणारे एकमेव माध्यम म्हणुन या महाविद्यालयाकडे पाहिले जाते. काही वस्ती पाडे आणि लहान लहान गावाकळील विद्यार्थी या माहविद्यालयात उच्च शिक्षण घेतात. साहित्य, कला आणि क्रिडा विभागात आपले कौशल्य दाखवितात. महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ प्राचार्य, प्राध्यापक व प्राद्यापकेतर कर्मचारी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सर्वेतोपरी योगदान देउन त्यांना विकसित करण्यात मदत करतात.

निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शनाने कार्यरत असणाऱ्या या महाविद्यालयात विद्यार्थाचा मानसिक व शारिरिक विकास करण्यासाठी विविध उपक्रम चालवले जातात. विद्यार्थ्यांच्या शारिरिक विकासासाठी क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. वैचारिक प्रबोधनासाठी शारदिय व्याख्यान माला, विविध चर्चासत्रे आणि तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन प्राप्त होत असते. स्वयंसिद्धा व कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून विद्यार्थीनींना आत्मनिर्भर बनविले जाते. आविस्कार, वाद-विवाद, कथा-कथन व वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी करून त्यांच्या सुप्त गुणांना प्रकट करण्याची संधी या महाविद्यालयात दिली जाते.

माहविद्यालयाचे प्रशासक व अध्यापन हे विद्यार्थी केंद्रीत असल्यामुळे गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना पुढे येण्यासाठी प्रसंगी आर्थिक मदत केली जाते. कमवा आणि शिका योजनेत अर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना सहभागी करुन त्यांना पदवीधर होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. आम्ही भी घडलो, तुम्ही भी घडानो! या संत वचनाला जागणाऱ्या आदर्श महाविद्यालयाचे अंतरंग म्हणजे हे **ज्ञानदिप** नियत कालीक होय.

आमच्या या सर्व कार्याला प्रेरणा देणारे माहविद्यालयाचे अध्यक्ष आदरणीय ॲड. बाबासाहेब शरदचंद्र शाह व व्यवस्थापन मंडळाच्या सहकार्याने प्राचार्य डॉ. अशोक पितांबर खैरनार यांच्या मार्गदर्शनाने आणि सर्व प्राद्यापक आणि प्राद्यापकतेर बंधु यांच्या सहयोगाने हा अंक पूर्णत्यास येत आहे तसेच संपादक मंडळातील सर्व सहकारी विद्यार्थी लेखक, या अंकाशी प्रिटीग व सजावट करणारे तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व सज्जनांचे ॠण स्विकारून आणि या अंकात ज्या काही उणिवा असतील त्या माझ्या मर्यादा समजुन अंकाचा स्विकार करावा अशी विनंती करतो.

धन्यवाद!

**डॉ. सुधाकर एल. जाधव**
सहाय्यक प्राध्यापक - समाजशास्त्र
आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर जैताणे

*****

# ❀ अंतरंग ❀


- सुंदर विवेचन - सूर्यवंशी महेश रावसाहेब
- यशाची गुरुकिल्ली - कु. चौरे सुनिता पोपट
- अगरबत्ती - मलिक अर्शियाबानो नाजीम
- महिलांचा सन्मान करणारा आदिवासी समाज - रोकडे वैशाली साहेबराव
- वाचन का आवश्यक - कु. अहिरे हिरा नवल
- आदिवासी की वनवासी - कु.अहिरे अनिता सुभाष
- खान्देशातील आदिवासींच्या देव देवता - ठाकरे दिनेश मोहाजी
- भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान - कु. वळवी मंगला आमश्या
- माहितीचा आधिकार अधिनियम - २००५ - कु. पाटील मिराबाई संतोष
- भारताचे आण्विक धोरण - कु. निलीमा भावराव शेवाळे
- मानसशास्त्रीय युद्धतंत्र - कु. भदाणे प्रियंका संजय
- हिंदू महासभा - कु. खैरनार कवीता साहेबराव
- आझाद हिंद फौज - कु. बागूल प्रिया दिलीप
- जीवसृष्टी आणि पर्यावरणाचा - कु. वळवी मंगला आमशा
- पर्यावरण संरक्षणासाठी कायद्याची अंमलबजावणी आवश्यक - पवार पनिलाल राजेंद्र
- पर्यावरण संतुलन प्रदूषणाच्या विळख्यात...! - सुर्यवंशी दिपक बाबुलाल
- संघर्षशील चेतना के जनकवि नागार्जुन - कु. मोहने इर्षाली मोहन
- रक्तदान ही जीवनदान - कु. मोहने मिना हेमंत
- **Quest for identity in Kamala Das's Poetry - Miss. Bharti Saindane**
- **Role and Importance of Communication - Miss. Bharti Mohane**
- **English Proverbs - Kavita Khairnar**


## अहवाल विभाग


- विद्यार्थी विकास अहवाल
- राष्ट्रीय सेवा योजना अहवाल
- कमवा व शिका योजना अहवाल
- प्राध्यापक प्रबोधिनी अहवाल
- संवाद व रोजगार कौशल्य विकास अहवाल

- **Department of English**
- **राज्यशास्त्र विभाग अहवाल**
- **समाजशास्त्र विभाग अहवाल**
- **इतिहास विभाग अहवाल**
- **वैयक्तिक अहवाल - प्रा.डॉ. विजय ग. गुरव**
- **क्रिडा विभाग अहवाल**
- **वैयक्तिक अहवाल - प्रा.प्रणव गरूड**
- **आर्थिक दुर्बल घटक योजना अहवाल**
- **विविध शैक्षणिक समित्या**
- **प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यादी**



पोपट पकडण्याची एक खास पद्धत आहे. एका आडव्या टांगलेल्या दोरीत बऱ्याच नळ्या ओवलेल्या असतात. या प्रत्येक नळीला पोपटाला आकर्षित करेल असे काहीतरी खाद्य चिकटवलेले असते. जेव्हा पोपट नळीवर बसतो, तेव्हा त्याच्या वजनाने नळी फिरते व पोपट उलटा लटकतो. उलटे लटकताच पोपट स्वाभाविकपणे पायात नळी पकडतो. ही अवस्था पोपटाने कधीच अणुभवलेली नसते. नळी सोडली की आपण पडू, असेच त्याला वाटत राहते. खरे तर नळी सोडल्यांनतर पडू लागताच पंखांचा वापर करून एक गिरकी घेऊन तो सहज उडू शकणार असतो. पण हे ज्ञान त्याला होत नाही व तो नळी अधिकच पकडून लटकलेला राहतो व पकडणाऱ्याच्या हाती पडतो. याला भयसापळा असे म्हणता येईल.

जेव्हा आपला पोपट झाला आहे असे वाटते व तरीही आपण त्या परिस्तितीतून सुटूच शकत नाही, तेव्हा आपण कशाला भीत आहोत ते नेमके पाहावे. हा आधार गेला तर, अशी भीती असते तेव्हा. जर काही काळ निराधार व्हायची तयारी दाखवली, तर आपणही उडून जाऊ शकत असतो. पडायची शक्यता ज्याला जराही नको वाटते, तो उडू शकत नाही..!

माकडे पकडायची देखील एक खास पद्धत आहे. एख मडके मातीत पुरून ठेवतात. मडक्यात एक फळ असते माकड ते फळ काढण्यासाठी मडक्यात हात घालते. मडक्याचे तोंड हे अगदी नेमक्या आकाराचे बनविलेले असते असे की फळ सोडून दिले तर माकडाचा हात बाहेर निघू शकेल पण फळासकट हात बाहेर काढायला जावे, तर हाताचा आकार वाढल्याने हात अडकेल. माकडाच्याने फळ सोडवतही नाही आणि त्यामुळे हात बाहोर काठता येत नाही. निर्णय न घेता येण्याचा या अवस्थेत माकड मनाने अडकते व शरिराने मडक्यापाशी. या सापळ्याला मोहसापळा असे म्हणता येईल.

आपले ज्या परिस्थितीत माकड झाले असेल, तीत असे काय आहे की ज्याला मोह आपल्याच्याने सोडवत नाहीये, ही जर बघता आले तर कदाचित ती गमावणूक वाटते तेवढी मोलाची नसेलसुद्धा! थोडेसे सोडून देऊन संपूर्ण सुटता आले तर वाईट काय? निदान या मर्यादित अर्थाने फलत्याग नक्कीच मुक्तिदायक नाही काय?

पोपटानं एकादा तरी आधार सोडून पाहावा. माकडानं एकदा तरी फळ सोडून पाहांव, हे जमायला अवघड नसतं. पटायलाच अवघड असतं. भयसापळा, मोहसापळा हे माणसाच्या तयार झालेले असतात. त्यामुळे त्यातून बाहेर पडणे अवघड नसते, पण सुटकेचा हा मार्ग सोपा असला तरी पटायला अवघड असतो.

**डॉ विकास आमटे**

**संकलक :- सूर्यवंशी महेश रावसाहेब**

**तृतीय वर्ष काल.मराठी विभाग**

*****






व्यवसायात यशस्वी व्हायचे असेल, तर कामाचे मूल्य (Value) आणि शुल्क (Price) यातला फरक ओळखा.

एका जहाजामध्ये काहीतरी बिघाड होतो. यामुळे समुद्रात नेणे अशक्य होऊन बसते जहाजाचे कर्मचारी सगंळ जहाज तपासून पाहतात, पण त्यांना दोष काही सापडत नाही. अथक प्रयत्न करूनही जेव्हा त्यांना अपयशच येते, तेव्हा ते जहाज बांधणी मधील तज्ञ व्याक्तीला बोलावतात. तो इंजिनियर येतो, संपूर्ण तपासणी करतो... जहाजाच्या एक पॅनल मधील स्क्रू ढिल्ला झालेला असतो, त्यामुळे संपूर्ण बॉडी मध्ये प्रॉब्लेम तयार झालेला आसतो. इंजिनियर तो स्क्रू पुन्हा पक्का बसवतो आणि जहाज पूर्ववत होते.

जाता जाता तो इंजिनियर त्याचे बिल जहाज कंपनीकडे सुपूर्द करतो आणि निघून जातो. ते बिल असते दहा हजार रुपयांचे! एक स्क्रू पक्का बसवण्यासाठी दहा हजार रुपये?.... कंपनीला ते जरा जास्त वाटतात. ते त्यांच्या एका कर्मचाऱ्याला त्या इंजिनियर कडे बिल दुरुस्त करायला पाठवतात. कर्मचारी जातो आणि इंजिनियरला स्क्रू पक्का बसवण्याचे इतके बिल कसे होऊ शकते, बिल कमी करा अशी विनंती करतो.

इंजिनियर त्या कर्मचाऱ्याच्या हातात नवीन बिल सोपवतो. त्यात लिहलेले असते, स्क्रू पक्का बसवण्याचे शुक्ल रू. १/ आणि कोणता स्क्रू ढिल्ला आहे हे शोधण्याचे मूल्य ९,९९९/-.

यावरून तुम्हाला मूल्य आणि शुल्क (किंमत) यातला फरक लक्षात आला असेल अशी अपेक्षा आहे. मी एखाद्याला कन्सल्टिंग करतो, तेव्हा त्यासाठी माझी कन्सल्टिंग फी आकारतो. त्यावेळी सुद्धा ही समस्या जाणवते. लोकांना वाटते कि दोन तास बोलायचे एवढे शुल्क कशाला! पण के शुल्क नसते तर मूल्य असते, माझ्या ज्ञानाचे, बुद्धीचे आणि वेळेचे! लोकांना समजावून सांगण्याच्या फंद्यात मी पडत नाही कालांतराने व्यावसायात समस्या जाणवायला लागल्या कि ते पुन्हा माझ्याकडेच येणार असतात. ते ग्राहक म्हणून आपल्या फी ला शुल्क म्हणून पाहत असतात आणि आपण व्यावसायिक म्हणून आपले मूल्य ठरवत असतो.

असो... तुम्हाला तुमच्या कामाचे मूल्य ओळखता आले पाहिजे. कित्येक ठिकाणी तुम्ही पाहिजे असेल कि पारंपारिक कला अंगी असलेल्या लोकांकडून हाताने बनविलल्या वस्तू अतिशय कमी किमतीत घेतल्या जातात. त्या उत्पादकांना आपल्या कडून पन्नास रुपयांना घेतलेली कलाकुसर बाहेर मार्केटमधे हजार रुपयांना विकली जाते, हे माहितही नसते. ते मिळेल तेवढे पैसे घेतात. याचे कारण त्यांना त्यांच्या कौशल्याचे मूल्य माहित नसते. त्यांना फक्त त्यांच्या कामाची किंमत माहित असते. एखादा कलाकुसरीचा टेबल हजार रुपयांना मिळत असेल तर तोच टेबल एखाद्या मोठ्या ब्रॅण्डच्या नावाखाली लाख रुपयांनासुद्धा विकला जाऊ शकतो. कारण त्या ब्रॅण्डने आपल्या वस्तूचे मूल्य ठरवलेले असते, किंमत नाही रोल्स रॉयस कारमध्ये सात-आठ कोटी खर्च करावेत असे खास -विशेष काही नाही. पण त्या ब्रॅडचे मूल्यच

इतके मोठे आहे कि ती अवाढव्य किंमतही त्या गाडीसमोर फिकी वाटते. एखादी पेंटिगं करोडो रुपयांना विकली जाते. याचे कारण तिचे मूल्य आहे, किंमत नाही.

कामाचे मूल्य मिळणे ही तशी सोपी गोष्ट नाही. त्यासाठी स्वतः ला सिद्ध करावे लागते... इतरांपेक्षा वरचढ व्हावे लागते... स्वत: चा ब्रॅड बनवावा लागतो... इतरांकडे नसेल असे ज्ञान-कौशल्य मिळवावे लागते .... हे ज्यांच्यासाठी अवघड आहे, त्यांना तसेही यश कमीच मिळते. त्यामुळे यात तडजोड होऊ शकत नाही.

कष्टाची किंमत मिळते,तर कौशल्याचे मूल्य मिळते. म्हणून कौशल्य आत्मसात करा. ज्या क्षेत्रात असाल त्यातले तज्ञ व्हा. अगदी बूट पॉलीश जरी करत असाल, तरी त्यातले असे कौशल्य आत्मसात करा, की मग लोक अशा पॉलिश साठी दोन नाही दोनशे रुपये सुद्धा देतील.

आपल्या कामाचे मूल्य ओळखा, किंमत तर सगळेच करतात. तुम्हाला तुमच्या कामाचा परतावा शुल्क म्हणून नाही तर मूल्य म्हणून ज्यावेळी लागतो. त्यावेळी तुमची यशाकडे भक्कम वाटचाल सुरू झालेली असते हे लक्षात घ्या.


**कु. चौरे सुनिता पोपट**

**प्रथम वर्ष कला ,मराठी विभाग**


*****






ती...!

मला भेटली फुटपाथवरच... भिक मागत... ! वय वर्षे ७० च्या आसपास... दिसायला काळीसावळी आणि अंगावर अक्षरशः अर्धा इंचाची घाण...

तीन फुटांच्या अंतरावर गेलो तरी विचित्र, अतिशय घाणेरडा एक वास येतो... अंगावर नाही म्हणायला एक मळकी साडी... (मळकी हा शब्द खुप थीटा आहे)

याला साडी का म्हणावं ? हाच मुळात प्रश्न आहे... अक्षरश पाच साडेपाच फुटाचं हे कापड ती अंगावर गुंडाळते... जे झाकायला जांव तेच उघडं पडतं... आणि दुर्दैव असं की तीला ते कळत नाही... जाणवत नाही... कारण डोळ्याच्या कसल्याशा प्राब्लेममुळे तीला काही दिसतच नाही...?

एकुण अवस्था अशी, की या आज्जीजवळ कुणी जावुच नये... तीच्याजवळ कुणी बसुच नये...! तरीही मी जातो, बसतो तीच्याजवळ... याचं कारण तीचं लाघवी बोलणं...

हिच्या गोबऱ्या गालातून एक एक शब्द असा बाहेर पडतो, जसा शंकराच्या पिंडीवर टांगलेल्या

अभिषेकपात्रातुन थेंब थेंब अभिषेक व्हावा, त्या पिंडीवर...! अतिशय शुद्ध आणि सात्त्विक !

भिक मागतांना म्हणते... बाळा तुला जमल काही तर मला दे, स्वतः ला अडचणीत टाकून मला काही देवु नकोस... आधी तु घे प्रसन्न हो, त्यातून काही उरलं आणि तुला जर मला द्यावंस वाटंल तरच दे... अन्यथा नको !

गोळ्या मागतांना म्हणते, डॉक्टरसाहेब, मला देण शक्य असेल तरच गोळ्या द्या. अहो माझ्यापेक्षा जास्त त्रास असणारे खुप अजुन, त्यांना द्या... मी काय, करेन थोडं सहन...!

दुसऱ्याचा विचार करण्यच्या तीच्या या वृत्तीमुळे मी हिच्याकंड आपसुकच ओढला गेलो होतो.

तीच्याजवळ बसलं की, तीचं बोलण ऐकता ऐकता बोलण्यातुनच संगध इतका घमघमायला लागतो की अंगावरून येणाऱ्या घाण वासाची जाणिवच होत नाही आपल्याला...

शेजारी बसंल की विचारते, मी एक श्लोक म्हणु... ? आणि आपल्या उत्तराची वाट न पाहता, ही विश्वप्रार्थना म्हणायला सुरूवात करते... सर्वांना चांगली बुद्धी दे ... आरोग्य दे... आणि तुझे गोड नाम अंखड मुखात राहू दे...!

या विश्वात ज्याच्याकडे सर्व काही आहे, तो स्वत ला अजुन काही तरी मिळुदे लाचार होतोय... आणि सर्वस्व गमावुन बसलेली ही आज्जी दुसऱ्याला सुखात ठेव म्हणुन प्रार्थांना करत्येय...!

स्वत साठी मागणं ही झाली लाचारी, आणि दुसऱ्यासाढी मागणं ही झाली प्रार्थना... दोन्हीतला फरक मला या आज्जीमुळेच समजला...!

ही आज्जी, एका मॉनेजर ची बायको. भरपुर श्रीमंती आणि खानदानी संस्कार. रास्तापेठेत जुना बंगला होता. सगळं काही होतं, पण घरात कुणी चिमुकलं नव्हतं दोन वेळा पोटातच बाळ गेलं. मरता मरता वाचली. तिसऱ्या वेळी डॉक्टरांनी सांगितलं आता तुम्हाला बाळ होणे नाही दत्तक घ्या.

मधल्या काळात यजमान गेले. इतके दिवस दुर असलेले सगळे नातेवाईक जवळ आले. आठवतील ती नाती सांगुन घराची वीट न वीट घेवुन गेले.

सगळी नाती बरोबर येतावा पोती घेवुन घेवुन आली होती. या पोत्यांतुन सर्वस्व वाहुन नेलं हिचं... हिच्याच डोळ्यांदेखत...

असलेली सगळी नाती हिंदकाळत गोती खात गेली, आणि वाड्याची ही खानदीनी मालकिण आता फुटपाथची राणी म्हणुन जगत्येय, गेली १५ वर्षे... विश्वप्रार्थना गात... सर्वांना सुखी ठेव म्हणत...! आपल्या अंगावर धड कापड नसतांनाही गात असते... सर्वांना ऐश्वर्यात ठेव...! सगळ्यांनी लुबाडुन घेतलं तरी आर्त प्रार्थना करते... सर्वांच भलं कर... कल्याण कर...

ऐकणारा तो तीचं ऐकतोय की नाही माहित नाही... तरीही गोबऱ्या गालांतुन हसत,वर बघत विश्वासांन म्हणत असते आणि तुझे गोड नाम अखंड मुखात राहू दे...!

मी एकदा चाचरत हिला म्हटलं, मावशी तु मनांन इतकी संदुर आहेस पण इतकी अस्वच्छ का राहतेस.

ती म्हटली, अस्वच्छ...? मी कुठंय अस्वच्छ...?

अगं हा वास...? मी आवंढा गिळत, नजर चोरत बोललो...

तीम्हटली, हा वास घाणेरडा का रे बाळा तुला? लहान आहेस तु बाळा अजुन... असे रस्त्यावर या घाणेरड्या वासानंच माझ्या, रक्षण केलंय माझं... ! ती हसत बोलली...!

म्हणजे...?

कानाजवळ येवुन बोलली तुला माहीत आहे? कापुर पेटवला की आजु बाजुला किडे येत नाहीत... मच्छरची अगरबत्ती पेटवली की मच्छर आसपास येवुन चावत नाहीत...

ही घाण नाही बाळा, हे माझ कापुर आहे... माझी अगरबत्ती आहे... या कापरामुळंच आणि अगरबत्ती मुळं समाजातले किडे आणि डास माझ्या वाऱ्यालाही येत नाहीत....

बापरे... मी हा विचार ऐकुन हादरलो... केवळ शील जपण्यासाठी जाणुन बुजुन ही घाणीत राहते...

आपण कुठल्या समाजात राहतो? स्वतःला जपण्यासाठी इंथ स्वतःला आधी घाणीत लोळवावं लागतं.. दुर्गंधाला आपलं कवचकुंडल बनवावं लागतं.

या आज्जीनं नवऱ्यामागं स्वत ला जपण्यासाठी अंगावर घाण चढवुन घेतली होती. मुद्दाम दुर्गंधीत झाली होती. गंमत पहा कशी, एका घाणीनं आणि दुर्गंधानं कुणाचं तरी पावित्र्य जपलं होतं... काटे बोचतात, पण फुलाला जपतात. तसं...

मी मनोमन या माऊलीला नमस्कार केला. आता अंगावरची तीच्या एक इंचाची घाण म्हणजे तीनं अंगावर चोपडुन घेतलेलं पवित्र भस्म आहे असं मला वाटायला लागलं, आणि तीच्यातुन येणारा दुर्गंध म्हणजे सुगंधी कापराचा वास...!!!

या आजीला मी डोळ्याच्या ऑपरेशन साठी घेवुन आलो २७ तारखेला. अंगावर तीच अर्धीमुर्धी साडी आणि तोच वास...!

दवाखान्यात बसलेल्या इतर सगळ्यांनीच हिला पाहुन नाक मुरडलं. नाकाला पदर लावले. कुणी कुणी चक्क उठुन निघुन गेले. बरोबरच आहे, चिखलात फुललेलं हे कमळ आहे, याची कुणालाच जाण नव्हती.. इतरांसाठी हा वास होता...आणि माझ्यासाठी सुगंध...

संदर्भ कसे झटक्यात बदलतात ना? बाळाच्या शी-शु चा आईला कधीच वास येत नाही दुर्गंधीत असुनही.

जवळचं कुणी माणुस गेल्यावर, पार्थिवाशेजारी ठेवलेल्या अगरबत्तीचा वास ही नकोसा वाटतो मग... सुगंधीत असुनही ...!

वास आणि सुगंध आपल्या मनाच्या कल्पना आहेत. समोरच्याविषयी आपली भावना महत्वाची. चांगली भावना असेल तर सुगंध नाहीतर फक्त घाणेरडा वास...!

मी आज्जीच्या अर्ध्या घातलेल्या साडीकडं पाहिलं आणि मुक नजरेनं आमच्या भुवड ताईकडं पाहिलं... भुवड ताईने त्याच मुक्या नजरेनं भुवड बाबांकडं पाहिलं कुणीच कुणाशी काही बोललं नाही.

बाबा उठले आणि झटक्यात बाहेर गेले. बरोबर २० मिनिटांनी परत आले. हातात दोन साड्या, एक गाऊन, मोती साबण, अंग घासण्याची घासणी टावेल...!

मला हेच सांगायचं होतं भुवड ताईंना. न बोलताही त्यांना कळलं. मुक्या नजराही किती बोलक्या असतात ना काहीवेळा...?

भुवड ताईनी मग, या माऊलीला दवाखान्यातल्याच बाथरूम मध्ये नेलं बाळाला चोळून घालावी तशी पावणे दोन तास आंघोळ घातली...

भुवड ताई या वेळी मला एका लेकराची माय वाटली. कुठल्याही वासाची लागण न झालेली...! जे आहे ते सांर सुगंधीत आहे अंस समजुन तो सुगंध अनुभवणारी.... आणि ती आज्जी झाली होती एक छोट निरागस बाळ...

बाथरुम मधुन दोघी बाहेर आल्या तेव्हा सगळ्यात जास्त सुंगध आला माझ्या भुनड ताईच्या हाताचा. जगातले सर्वात सुंदर हात होते ते, आणि तितकेच सुंगधी...! शुचिर्भुत झालेल्या आजीचं नवं रुप पाहुन मी स्तिमित झालो...

आजीचं २७ तारखेलाच डोळ्यांच ऑपरेशनही करुन घेतलं. आता तीला दिसायला लागेल !

ऑपरेशननंतर, मी तीचे हात हातात घेवुन म्हटलं, आज्जी, तुझ्या अंगावरचं भस्म आणि कापराचा वास आज आम्ही काढुन टाकलाय. तुझी ही

कवचकुंडलं काढुन घेतली आहेत, पण काळजी करु नकोस. तुला आजपासुन अशा कवचकुंडलांची गरज पडणार नाही....

म्हणजे ? आज्जी बोलली....

मी म्हटंल.... आता जीथं तुला सन्मानानं सांभाळतील अशा ठिकाणी मी तुझी व्यावस्था करणार आहे. इथुन पुंठ तु गटारीत घाणीत फुटपाथवर राहणार नाहीस. मी ठेवेन तुला चांगल्या ठिकाणी....!

पण तु हे का करतोयस माझ्यासाठी? तींन निरगस पणे विचारलं...

मी ही तितक्याच निरागसतेनं सांगीतलं तु मला सांगीतलं होतंस ना? तुझं बाळ दोनवेळा पोटातच गेलं.... अंग ते गेलं नव्हतंच कधी.... डॉक्टरांनी खोटंच सांगितलं होत तुला.... मी तेच बाळ आहे तुझं....!! फिरुनी पुन्हा जन्मलो मी....!!!

तीचे डोळे डबडबले... मझ्या गालावरून हात फिरवत,ती प्रसन्न हसली... म्हणाली श्लोक म्हणु....?

नेहमीसारखीच उत्तराची अपेक्षा न ठेवता तीनं डोळे मिटले. माझे हात हाती घेतले. ते हात तसेच हातात ठेवुन तीने स्वतः चेही हात जोडले... आणि वि श्वप्रार्थना सुरू केली... माझे हात हाती घेवून.... सर्वांना चांगली बुद्धी दे... सर्वांचं भलं कर, आनंदात ऐश्वर्यात, सुखात ठेव, कल्याण कर, रक्षण कर.... आणि तुझे गोड नाम अखंड मुकात राहु दे....!

मी तीच्याकडं एकटक पाहत होतो.स्वत जळत राहून दुसऱ्याला सुगंध देणारी ती एक सुवासिक अगरबत्ती आहे असा मला त्यावेळी भास झाला....!!!

आणि सारा आसमंत चक्कं सुगंधी झाला...!!!

**मलिक अर्शियाबानो नाजीम**

**द्वितीय वर्ष कला, मराठी विभाग**

*****



वर्तमान काळात भारतीय समाजात विविध जाती. जमाती आणि धर्माचे लोक वास्तणअय करतात. हिंदू, मुस्लीम, बौध्द, शिख आणि जैन धर्माच्या लोकांबरोबरच आठरापगड जातीचे लोक भारतात राहतात. या विविध समुदायांचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून येते की, भारतात आदिवासी समाज सोडुन इतर बहुसंख्य समाजात स्त्रीयांना दूय्यमस्थान दिले जाते. काही ठिकाणी तर तीला दासी चा दर्जा दिला जातो. पतीची सेवा करणे, मुल जन्माला घालणे आणि कुंटूब सांभाळणे एवठ्याच कामी स्त्रीयांची गरज असते असे मानले जाते. रांधा, वाढा उष्टी काढा आणी चूल व मूल हेच स्त्रीचे विश्व असते. कुटुंबातील महत्वाच्या कामी स्त्रीयांना सहभागी करुन घेतले जात नाही कुटुंबाचे महत्वाच्या कामी स्त्रीयांना सहभागी करुन घेतले जात नाही कुटुंबाचे आर्थिक व्यवहार, विवाहकार्ये, निर्णय प्रक्रिया किंवा कुटुंबाचा विकास कसा करावा या बाबत स्त्रीयांचे मन विचारात घेतले जात नाही. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत महिलांना स्वतचे नाव देखील लावता येत नाही. वंशाच्या दिवा म्हणून मुलांकडे न पाहता मुलाचाच विचार केला जतो. याचाच अर्थ भारतातील बहुसंख्य समाजात महिलांना अपेक्षित ठेवले जाते.

आदिवासी समाज मात्र नेहमी स्त्रीया सन्मान करणारा समाज म्हणून ओळखला जातो. भारतातील दक्षिणे कडच्या राज्यात खासी,गोरो,तोडा,नायर इत्यादी आदिवासीत मातृसत्ताक कुटुंब पद्धती आहे हे कुटुंब थारवड नावाने ओळखले जाते. इथे पुरुषाला सासरी अर्थात पत्नीकडे नांदावयास जावे लागते. वंश मातेच्या नावाने चालतो, या कुटुंबात मामा चे महत्व असते. केरळ सारखे छोटेसे राज्य आणि मलबार व वैजंतिया हे कड्यांवरील आदिवासीत महिला कुटुंब प्रमुख असतात मुलांच्या नावा मागे आईचे नाम लावले जाते. मुली स्वतः च्या इच्छेने विवाह करु शकतात. घरातील सगळे व्यावहार मुलीच करतात महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासीत महिलांना पुरूषापेक्षा श्रेष्ट मानले जाते. भिल्ल, पावरा आदिवासीत मुलीला हुंडा दिला जातो. विवाह कार्यात मुला पेक्षा मुलीला जास्त सन्मान मिळतो. एवठेच नव्हेतर खान्देशातील कोकणी आदिवासीत धार्मिक प्रसंगी किंवा विवाह समारंभात स्त्रीयांना प्रथम जेवन दिले जाते. धार्मिक कार्य जसे डोंगऱ्या देव उपासणेत पुरुषांना मावल्या (माऊली ) असे संबोधले जाते. शेती व्यावसायात महिलांचा निर्णय अंतिम मानला जातो. घरजावई असणाऱ्या पुरुषाला सासऱ्याचे काम करुदिले नाही तर तो त्याचा अपमान मानला जातो. या शिवाय काही आदिवासीत घरघुती विवाह प्रथा आठळते म्हणजे एखादी महिला तिच्या इच्छेने आवडल्या पुरूषाच्या घरात घुसुन त्याच्या सोबत संसार करु शकते यायाच अर्थ आदिसमाजात महिलांना सन्मान दिला जातो.

**रोकडे वैशाली साहेबराव**

**टि.वाय.बी.ए समाजशास्त्र विभाग**

*****



आजच्या बदलत्या समाज व्यवस्थेत व विज्ञान प्रगती मुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन हे असे माध्यम आहे की माणसाचा सर्वांगीन विकासासाठी महत्व पुर्ण आहे. परंतु बदलत्या व वर्तमान स्तितीमुळे तरूण वर्ग हा वाचनापासुन लांब जात आहे. आज पावित्रो च्या महापुरूषांच्या जिवन चरित्राच्या विचार केला असता प्रती प्रकर्षाने त्यांचा स्व:ता च्या जिवनावर वाचनाने आलेल्या एखाद्या महा पुरूषाचा प्रभाव त्याच्या जिवन मानावर प्रभाव वाढवुन त्या पद्धतीने समाज जिवन जगण्याचा ते स्वः ता प्रयत्न करतात व तसा समाज त्यांच्या नजरेत तयार व्हावा अशी स्वाभाविक इच्छा तयार होते म्हणुन वाचन हे प्रत्येकाच्या जिवनावर एक वेगळे व्याक्तीमत्व घडविण्यास फार प्रभावी अर्थ करू शकते म्हणुन असे म्हटले जाते.

एखादे पुस्तक एखाद्याच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते एक एखाद्याचे आऊष्य बदल शकते आणि एखादे वाक्य आयुष्याचे ध्येय ठरवु शकते एवठी ताकद वाचणात आहे. श्रीमंत माणसच वाचन करतात असे नाही वाचन करणारे श्रीमंत होतात उत्तम मेदुंसाठी दररोज दोन तास वाचन केलेच पाहिजे.

जगाचा आता पर्यन्त जो विकास झाला आहे. तो वाचनामुळे आणि जगाचा आता ध्यास होणार आहे तो टी. व्ही. व मोबाईल मुळेच.

पुस्तक वाचणारा माणुस कधिच व्यसन करत नाही. वाचनामुळे ज्ञान! वाचन करणारा माणूस मनाने विचाराचे आणि कृतीने श्रीमंत होतात.  वाचन करणारा माणुस शांतअसतो त्यामुळे त्याला रक्तदाब वाढणे, हृदय विकाराचा झटका येणे अशा गोष्टी संभवत नाहीत. उलट जास्त वेळ टी.व्ही. मोबाईल वापरणारेच विविध रोगांना बळी पडत असल्याचे दिसते. वाचन करणारा माणुस लवकर झोपतो. लवकर उठतो. टी.व्ही. मोबाईलमुळे उशिरा झोपतात, उशिरा उठतात. शरिर संपदेसह श्रीमंतीही नष्ट होते. लवकर निजे लवकर उठे त्याला अरोग्य लाभे. वाचन करणारा व्याक्ती चारच तासच काम करतो करोड पती व्यक्ती चारच तासच काम करूनही गाडिबितच रहातो वाटनामुळे बनतो जिथे वाचन होते तेथे विचार होतात जिथे विचारांचे स्वातंत्र्य नाही तेथे गुलामी येते. ज्याना आयुष्यात कुढेले ही ध्येय नाही ते लोक पुस्तक वाचत नाहीत. आयुष्यत वाचणाला जितके महत्व ध्याल तितकी तुमची उंची गाटू शकणारा नही म्हणुन जिवनात वाचणाला असे महत्व ध्या की लोंक तुमच्या विचारांना झपाटाले गेले पाहिजे

**कु. अहिरे हिरा नवल**

**टी.वाय.बी.ए. (समाजशास्त्र)**

*****






देशातील आदिवासी जनसमूहांना विभिन्न नावांनी ओळखले जाते. राज्यघटनेत त्यांच्या उल्लेख अनुसुचीत जमाती असा आहे परंतु त्यामुळे आदिवासी जनसमुहाची सोशल आयडेन्टीटी स्पष्ट होत नाही. आदिवासी या शब्दाचा वापर व्हावा व त्याला घटनात्मक संरक्षण देण्यात यावे असे आदीवासीना वाटू लागले आहे. आता देशभरच्या आदीवासी जनतेत नवे आत्मभात आल्याने व स्वतच्या अस्तित्वाची जाणीव झाल्याने अनुसूचीत जमातीऐवजी आदीवासी समाज मूळ निवासी असतानाही काही संस्था सघटना राजकीय पक्ष जाणीवपूर्वक वनवासी हे संबोधन पदतशीरपणे रूढ करू पाहत आहेत आदीवसी हे आपल्यापेक्षा तिराळे आपल्यापासून दुरचे वाटू लागले आहेत हा समज आणि भावना उत्पन्न करून ती हामुळे करण्याकरीता जानबूजून आदीवासी लोग नागरी वस्तापासून अगदी दुर डोगरदऱ्यामध्ये जगलामध्ये राहतात त्यांना परभुत करुन दऱ्याखोऱ्यात दुर हाकलून दीले आपल्या अंगोपागंमध्ये  विभक्तपणा आमण्यामध्ये ज्यांचे हीतसंबध गुंतलेले आहेत आदीवासी एकावेळेचच अन्न, वस्त्र, भरपूर असते निगर आदीवासी समाज हा आक्रमनकारी दुसऱ्यांना लुबाडणरा आहे. खंर म्हणजे आदीवासी लोकांना पंरपरेने आपल्यापेकीच मानलेली आहे. आदीवासी वनवासी हे वस्त्र  अन्न मिळत असत डोगऱ्या दऱ्यामध्ये राहत असतात.

आदीवासींबदल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे जगंल दऱ्याखोऱ्यात राहणारे राणटी जंगली लोक खर पाहता आदीवासी हेच या देशाचे मुळ आदीवासी नोहरूत येणाऱ्या सबळानी त्याचे सखल प्रदेश व्यापले आणि त्यांना जगल दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावां लागला इतरांनीही त्याच्या कडे दुर्लष केले. त्यामुळे शेकडो वर्षे ते अज्ञनी आणि आशिशीत राहीले. आदीवासी लोक गरीब भोळेभानळे असतात. वनवासी म्हणतात. या भुमीचे ते मुळ निवास आहेत की कल्पणा त्यांना वनवासी तरी का म्हणावेत वास्तविक या देशाची मुळ संस्कृती आहे आदीवासी संस्कृती वैदीक संस्कृती त्यानतंर आली त्यामुळेच आदीवासीचे मुळ रूप जनसामान्यापुढे आले नाही खरा वनवास आदीवासीा सुरू झाल तो तेयून त्याचा तो वनवास अद्याप संपलेला नाही. कंधी संपेल हे सागता येत नाही.

पुरातन काळी संस्कृत साहित्यात आदिवासी जमतीचा उल्लेख आलेला आहे रामायन महाभारताचा काळ साधारण चार पाच हजारर वर्षापूर्वीचा असावा आदीवासी टोळयांना गंणं म्हणत आणि या गणांचे जे प्रमुख होते. त्याता गजपती किंवा गणनायाक म्हणत. आदीवासी गणांची राज्ये हीमालयाच्या पायत्थाशी तसेत इतर भागांतीही होती ही गणराज्ये आपली गुलाम व्हावीत म्हणून त्या वेळेच्या सम्राटानी खूप प्रयत्न केले. आर्य भारतात आले त्यावेळी येरो पराभवापसून वस्ती करून राहणाऱ्या जमाती त्याता प्रथम दिसल्या पव केतळ गण नायकाला ठार करून ते गुलाम होत नसत एक गणनायक गेला तर दुसरा कोणीतरी शूर माणुस नायक व्हायला गणनायकाचा आपसात भांडणे लावून त्याना दारूचे व्यासन लावून सुंदर स्त्रिया पाढवून या गणची शक्ती कमी करावी आदीवासी गण इतिहास उज्ज्वल पंरपंरानी आणि शौर्यगाथानी भरलेलला दीसतो भारतभुमीचा नदूसक भुगाग आदीवासी राज्याती व्यापलेला होता मध्यभारतात वौभव शाली गोडं राज्ये होती उत्तार पाश्चिम भारतात भिल्लाची राज्ये होती मारवाड्याचे पठार माळण्यचे पठार ते शेच्ट सातपूड्याचा सातमाळा आणि महदवेडोगंर ते आजिन्याचा रांगा अशा विस्तीर्ण या राज्याचा सीमा पसरल्या कहोत्या भिलवाड नावाने हा प्रदेश ओळखला जाई भिल्लांच्या राजाऐश्वर्याचा आणि पराक्रमाचा अनेक खूणा आजही या प्रदेशामध्ये दिसतात.



आदीवासी स्वतंत्र्य राज्ये होती उत्तर आणि पूर्व मध्य प्रदेशांत देखील नागा, मिओ संथाळ हू आरात या इतिहाराचा मागोवा होतात आदीवासीच्या गतकाळाची आढवन कोणाला आहे.

आदीवासी शब्दांत जी आस्मिता आहे. जो स्वंयगौरव आहे जो आत्मसन्मान आहे. आदीवासी वनस्पती म्हणून होवे अजीनात पसंत नाही आदीवासू डोगर दऱ्यामध्ये राहून वनवासी ते खाऱ्यासाढी वनस्पती होत असते.

आदीवासी वनवासी मागासलेत संभोदले जातात डोगंर दऱ्यात त्या रानटी लोग समजले जाते.

**कु.अहिरे अनिता सुभाष**

**टी.वाय.बी.ए (समाजशास्त्र)**

*****




खान्देशातील आदिवासी हा प्रामुख्याने सादपुडा प्रदेश म्हणुन ओळखला जातो. यात मध्यप्रदेश गुजरात महाराष्ट्राचील नंदुरबार धुळे जिल्यातील समावेश होतो. या सतपुडा भागात आदिवासी बांधव आपली स्वः ताची एक विशेष ओळख घेवून जगत आला आहे. त्यात तापी व नर्मदा नद्यांच्या खोऱ्यामधील प्रदेश म्हणजे. भिलवाड भिल्लांचा प्रदेश या नावाने ओळखाला जातो. या समुहाचे आस्तित्व रामायण काळातील प्रभु रामचंद्र जेव्हा दण्डकारण्यात आले तेव्हा त्यानां शवरी नावाची भिल्लीण भेटली होती. असा उल्लेख सापडतो. त्याकाळात या प्रदेशात राहणाऱ्या लोकाना शबर, किरात, निवाह या नावानी ओळखले जात त्या काळापासुन आदिवासी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष स्वरूपात अदभूत चमत्कार विस्वास मुल्य श्रद्धा यांच्या आधारावर जगत आला . आहे त्यात अनेक देवदेवतांची सुख दुःखाप्रसंगी सण उत्सव पुजाविधी केली जातात.त्याचे स्मरण व्हावे त्यांची कृपा द्रुष्टी आपल्यावर रहावी याकरिता सदैव श्रध्हाळु राहीला . म्हणुन या पहिसरात असलेल्या अनेक वस्तुना हे लोक देवदेवताचे रुप मानुन कडे कपारीमील उभ्या खडकाना शेदुर फासून त्यास देव मानत आहे आहेत.

आदिवासी बांधव देवदेवतांवर विस्वास विस्वास ठेवत त्यात गावावर अरिष्ठ कोसळु नये म्हणून गावाच्या संरक्षणार्थ शिवाऱ्या देवाची पुजा करतात. दुध दुभत्या साठी भवळी देवाची पुजा करतात. वाघाने गावातील लोकाना त्रास देऊ नये त्यासाठी वाघाची पुजा करतात गिऱ्हुण भिल्लांची कुलदेवता असते स्वयसंपाक घरात अडीच ते तिन फुट लांबीचे सागाचे लाकुड रोवुन गिऱ्हुण भिल्लांची कुलदेवता असते. स्वयपाक अडीच ते तिनफुट लांबीचे सागाचे लाकुड रोवुन गिऱ्हुणची स्थापना केली जाते. धार्मिक सभारंभाप्रसंगी गिहुण हमखास पुजा तर धरतीवर रहातो धरती मातेचे देणे लागतो म्हणून धरती मातेस पुजतात तर उणसरी ही अन्नधान्याची देवता असुन शेतीतुन मकाः ज्वारी, आदि अन्नधान्य कण देवीच्या क्रृपेने मिळतात. असे आदिवासी मानतात सुगिच्या हंगामात प्रत्येक माणुस कणसरीची पूजा करतो. रवांदीराजा म्हणजे त्याचा श्रमाच्या उतराई म्हणुन बैलास देव मानुन त्याची पुजा करतात. श्वोवो श्री पु देखील पुजा केली जाते. खोवो म्हणजे खळे खळ्यात अन्नधान्याची मळणी करतात यात भुत पिशात्व अवकृपा राहू नये म्हणुन या देवदेवतेची पुजा करतात. जगाला प्रकाश देणारा दोव देव म्हणजे सुर्य या सुर्यदेवतेची देखील पुजा करतात. साढी ही आग्नि देवता गावातील वैभव मांगल्य टिकवते आग्निला हिंरज पशु, विषारी जीवजंतु घाबरुन पळतात म्हणुन आग्नि देवतेची देखील पुजा करतात. गावदेव म्हणजे गोवीदेव म्हणजे गावाच्या वेशीवर दगडाला शेंदुर लावुन गोवीदेव याची स्थापना करतात.

हिवाच्या देव हा गावाच्या शिवेवर दगड गोट्याला शेंदुर फासुन याची स्थापना केली जाते. कुठल्याही शुभप्रसंगी धार्मिक कार्याच्या सुरवातीला पुजाकेली जाते हा सर्वात कोपीस्ट देव समजाला जातो. याला करीचे किवा कोंबडीचे काळीजच फक्त अर्पण केले जाते.

आसराव ही नदी-नाल्या काठची देवता आहे. पाल्या हा अचानक मृत पावलेल्या व्यक्ती स्मारक

उभारले जाते यास पाल्या म्हणतात. तर उभारलेल्या स्मारकास गाता असे संबोधले जाते भावाच्या शिवेच्या देवांमध्ये हुडोदेव, विलटदेव, लाकडीव राणा, दाऊराना, कुंभाय राणा, चोहोर राणा, असराव, पांढरमाता, हिव्बारदेव, गोवीदेव इत्यादी देवदेवता असतात त्या सर्वाना बोकड कोबडीचे बळीचटवतात.दारूच्या अर्ध्य देतात.

त्याच प्रमाणे वाधदेव गुरा ठोरांना लोकाना वाघाने वापकडे नये म्हणून त्यास प्रसन्न करण्यासाठी त्याची पुजा करतात. निईचारी ओला पुजताला, हुडामुकाय, वायुदेव पुजा , नवाई, दिवाळी पोळा, गोव्हाण , पुजा इंदल पुजा होळी, गुलाल्या बाजार भोंगच्या बाजार रंगपंचमी बुध्या बावा नृत्य प्रकार असे अनेक कलाविष्कार व अंगमहेनती होईल असे कलाप्रकार विशिष्ट देवदेवतेच्या स्मरण करण्याच्या वेळेस किंवा त्या त्या दिवशी ऋतुमाना सादर करतात. म्हणुन देवदेवतेच्या स्मरण करण्यामागे देवदेवतांची अवकृपा राहू नये त्यांन्ची कृपा द्रुष्टी आपल्यावर कायम रहावी म्हणुन देवदेवता सण उत्सव प्रसंगी सर्व आदिवासी बांधव सहभागी होतात. आणि खान्देशातील आदिवासीच्या जिवनात देवदेवताचे अनन्य साधारण महात्व दिसुन येते देवदेवतांवर विश्वास ठेवल्या शिवाय आपले जिवन जगुच शकत नाही. असे पाहवयास मिळते.

**ठाकरे दिनेश मोहाजी**

**एस.वाय.बी.ए. (समाजशास्त्र)**

*****






आपल्या भारत देशात अनेक सामाजिक, राजकीय पुढारी, नेते होऊन गेले. परंतु यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान अग्रगण्य आहे.

डॉ. आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महु येथे झाला. त्यांचा जन्म महार जातीत झाल्यामुळे त्यांना समाजाकडुन अतिशय त्रास होत गेला. हा सर्व त्रास सहन करीत त्यांनी आपले शिक्षण पुर्ण केले. एम.ए., पीएच.डी., डी.एस.सी., एल.एल.डी., लिट्., बार अॅट लॉ अशा अनेक पदव्यांचे ते धऩी झालेत.

डॉ. आंबेडकर जेव्हा परदेशात शिक्षणासाठी गेले. तेव्हा त्यांना भारत व इतर परकीय देश यांच्या मध्ये तफावत दिसली. भारतात अस्पृश्यता पाळली जाते. पण इतर देशात असे काहीही नव्हते. भारत हा देश गुलामगिरीत जखडला होता. भारतीय नेते हा देश जुलमी गुलामगिरीतुन निसटण्यासाठी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न करीत होते. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाची एक घटना असावी अशी संकल्पना मांडली तेव्हा १६ मे १९४६ रोजी त्रिमंत्री योजनेनुसार भारतीय राज्यघटना तयार करण्यात येईल असे मान्य करण्यात आले. घटना समितीचे अध्यक्ष म्हणुन डॉ. राजेंद्रप्रसाद यांना निवडले

तर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची नियुक्ती करण्यात आली होती.

डॉ. आंबेडकरांनी घटना लिहीतांना इतर देशांच्या घटनांच्या तुलनात्मकदृष्ट्या विचार करून परिश्रम घेऊन घटना लिहीली. भारतीय घटना २६ नाव्हेंबर १९५९ रोजी लिहुन पुर्ण झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर सही केली व नंतर २६ जानेवारी १९५० पासुन घटना अंमलात आणण्यास सुरुवात झाली. म्हणुन आपण २६ जानेवारी हा दिवस गणराज्य दिन म्हणुन साजरा करतो.

डॉ. आंबेडकरांना ज्यावेळेस घटना लिहून दिली तेव्हा तिच्यात ३१५ कलमे १८ परिशिष्ट्ये होती. आजच्या घटनेत दुरुस्ती करुन कलमे वाढवली आहेत. त्यांनी देशातील सर्व राज्यांचा, प्रांतांचा, सामाजिक, राजकीय, आर्थिक अभ्यास करुन घटना लिहीली. डॉ. आंबेडकरांनी सांसदीय सार्वभौम लोकशाही स्वीकारली. यामध्ये राष्ट्रपती हा देशाचा घटनात्मक प्रमुख असतो. राष्ट्रपती, संसद आणि संघराज्याचे मंत्रीमंडळ यांच्यावर देशाच्या राज्यकारभाराची जबाबदारी आहे. न्यायदानासाठी भारताचे सर्वश्रेष्ठ न्यायालय घटनेने स्थापन केले आहे. हे न्यायालय राज्य घटनेचे व नागरिकांच्या मुलभुत हक्कांचे संरक्षण करते. स्वतंत्र्य न्याय खाते हे लोकशाहीची साक्ष आहे.

डॉ. आंबेडकर यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणुन आपण ओळखतो किंवा घटनेविषयीची त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्ण दारांनी लिहुन ठेवण्ययाचे आहे. त्यांनी दलित लोकांना राखीव जागा यासाठी घटनेस खास तरतुद केलेली आहे. घटनेतील तिसऱ्या भागातील कलम. १५, १६, १७, १९, २३, २५, २९ या नुसार हक्काच्या तरतुदी व संरक्षणविषयक तरतुदी पहिल्या की घटनाकारांच्या कामगिरीचे मोल लक्षात येते. तसेच १६ व्या भागातील कलम ३३०, ३३४, ३३५, ३३८, ३४१, ३४२ यामध्ये ही हक्काच्या तरतुदी केल्या आहेत.

भारतीय घटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुता हे फ्रेंच राज्यक्रांतीचे दिलेल्या तत्वांचा स्वीकार केला आहे. तसेच न्याय या तत्वाचाही स्वीकार केला आहे. लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांकरीता व लोकांनी चालविलेले राज्य. पण आंबेडकरांची लोकशाहीची व्याख्या वेगळी होती. लोकांच्या राजकीय व सामाजिक जीवनात रक्ताचा एकही थेंब न गाळता क्रांतीकारक बदल घडवुन आणणे म्हणजे लोकशाही. आंबेडकरांनी एक माणुस एक मुल्य या लोकशाहीच्या चिरंतर तत्वाचा आग्रह धरला होता. लोकशाहीत विरोधी पक्षाला महत्वाचे स्थान असते.

**लोकशाहीत मुलभुत तत्त्वे सांगितली आहेत :-**

१) सर्व सामान्य जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळणे अशी समाजरचणा करणे.

२) प्रत्येकी स्त्री पुरुषाला निर्वाहासाठी लागणारी साधणे मिळाली पाहिजे.

३) राष्ट्रांच्या नैसर्गिक संपत्तीचे वाटप सर्वांच्या हिताच्या दृष्टीने झाले पाहिजे.

४) संपत्ती अथवा संपत्ती निर्माण करण्याची साधने थोड्या माणसांच्या मालकीची नसावीत.

५) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे.

६) आंतरराष्ट्रीय तह व कायदे यांचे पालन करावे.

**भारतीय घटनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:-**

१) भारतीय घटना ही लिखित स्वरुपाची आहे.

२) भारतीय घटना ही अंशत लवचिक व अंशतः ताठर स्वरुपाची आहे म्हणजेच सुवर्ण मध्य साधणारी आहे.

३) भारतीय घटना ही सार्वभौम प्रजासत्ताक या तत्वांनी बनली आहे.

४) भारतीय घटनेत प्रौढ मतधिकार दिलेला आहे. राजापासुन तर रंकापर्यंच प्रोढ मतदानाचा अधिकार सांगितलेला आहे.

५) भारतीय घटनेत नागरिकाला एकच नागरिकत्व दिलेली आहे. इतर देशांमध्ये राज्याचे व देशाचे नागरिकत्व देण्यात येते

भारतीय घटनेत न्याय संस्थेला स्वतंत्र स्थान दिलेले आहे. कारण न्यायसंस्था ही जनतेचे व भारतीय घटनेचे रक्षण करते. आंबेडकरांनी ही घटना २ वर्षे ११ महिने १७ दिवसात रक्ताचे पाणी करुण डोळ्यात तेस घालुन तयार केली. आंबेडकरांना लोकशाही पद्धती ही भारतात नांदेल किंवा नाही याबाबतीत संशय होता लोकशाही ही शासन पद्धती नसुन आज जीवनपद्धती बवलेली आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न, दलितांचे कैवारी, ज्ञानमहर्षी म्हणुन तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य महान आहेच त्याचबरोबर त्यांचे भारतीय घटनेतील योगदावन महत्वाचे आहे.

**कु. वळवी मंगला आमश्या**

**टी.वाय.बी.ए. (राज्यशास्त्र विभाग)**

*****







माहिती ही आपले अधिकार व हितसंबध याबाबतची असेल तर तिचे एक विशेष महत्व असते. महितीच्या अधिकारामुळे भारतीय नागरिकांना शासनाच्या कारभाराबद्दल माहीती मिळविण्याचा मार्ग खुला झाले आहे.

हा कायदा आस्तित्वात आल्यामुळे माहिती देण्याचा अथवा राखून ठेवण्याच्या संदर्भातील कार्यतलीयन गोपनीयतेचा अधिनियम १९२३ च्या तरतुदींसह इतर कायद्यातील या कायधांशी विसंगत असल्यास सर्व तरतूदी विष्प्र झाल्या आहे व सर्वसामान्य भारतीय नागरीकाना महत्वपूर्ण माहीती मिळू लागली आहे व लोकशाही सर्वसामान्य मानसाचा दरात आली आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना माहिती मिळविण्याचा व्यवहार्य मार्ग म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २०००५ व २ ऑक्टोबर २००५ पासून अमलात आणला या कायद्याच्या रुपाने शासनाने नागरिकांना त्यांचा हक म्हणून एक प्रभावी साधन दिले हा कायदा शासनाच्या सर्व स्तरांना म्हणजे केंद्र राज्य व स्थानिक स्तरांना लागू होतो आणि त्याचबरोबर शासकीय अणुदानांचा लाभ होणाऱ्या सर्व संस्थावरही बंधनकारक आहे.

**माहीतीचा आधिकार आधिनियमाचे उद्दिष्टः-**

या कायद्याचे मुख्य उद्दिष्टे नागरिकांना सक्षण करणे, शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व याना प्रोत्साहन देणे भ्रष्ट्रचार नियंत्रित करणे आणि खऱ्या अर्थाने लोकांसाठी काम करणारी लोकशाही निर्माण करणे हे आहे.

**माहिती म्हणजे काय?**

माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरूपातील कोणतीही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख दस्तऐवज, ज्ञापने (मेमोज), ई-मेल, आभिप्राय, सुचना प्रसिद्धीपत्रके, आदेश रोजवह्या , संविदा (कॉन्टॉक्ट) अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिप्रमाणे (मॉडेल). कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आंधार सामग्री यांचा संमावेश होतो.

**माहीतीचा आधिकार :-**

१) कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व माहितीच्या आधिकारान्वये मिळविता येण्याजोगी माहीती मिळविण्याचा अधिकार भारतातील प्रत्येक नागरीकाला आहे. या आधिकारामध्ये शासकीय व निमशासकीय कार्यालयाकडे उपलब्ध असलेले एखादे काम. लागबक्स प्राप्त झालेले सल्ले, परिपत्रके, आदेश, निवीदा अहवाल. अभीलेख व दस्तऐवजीची पहाणी अभिलेख व दस्तऐवजाच्या टिपण्या उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे यांचा समावेश होतो व एक महत्त्वाची बाब म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली आणि प्रत्यक्ष अस्तित्त्वात असलेलीच माहीती या कायद्याने मिळू शकते ज्या स्वरूपात जी मीहती उपलब्ध आहे त्याच स्वरूपात ती दिली पाहिजे, जन माहीती आधिकाऱ्याने नव्याने माहीती करणे किंवा अर्थ लावणे किंवा अर्जदाराने उपस्तित केलेल्या समस्या सोडविणे, जर, तर काय? इत्यादी स्वरूपाच्या प्रश्नांची उत्त्तरे देणे हे माहिती अधिकारात अपेक्षेत नाही.

२) हा आधिकार नागरिकांना संसद व राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचा बरोबरीने माहितीचा अधिकार प्राप्त करुन देतो. या कायद्यान्वये जी माहीती संसदेला व राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही. ती माहीती कोणत्याही नागरिकाला देण्यास नकार देता येणार नाही.

३) नागरिकांना, डिस्केटस, फ्लॉपी डेप्स, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकरणातील माहिती मिळविण्याचा अधिकार आहे किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य उपकरणात साठविलेली असेल. जी ई-मेलद्वारे पाठविता येईल.त्या बाबतीत मुद्रित प्रती (प्रिंट आऊट) मार्फत माहिती मिळविण्याचा अधिकार आहे.

४) या कायद्यान्वये भारतीय नागरिकांनाच माहितीचा अधिकार प्राप्त होतो. या कायद्यातील तरतुदीनुसार संघटित संस्था संघटना निकाय, स्वयंसेवी संस्था इत्यादी कायदेशीर अर्थाने कृत्रिम व्याक्ती अलल्यातरी नागरिक नाहीत त्यामुळे त्यांना हा अधिकार वापरता येणार नाही.

माहिती अधिकार कायद्यामुळे काय शक्य झाले? माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्त्वात आल्यापासुन सर्वसामान्य नागरिकांना खालील प्रणाणे माहीती सहज शक्य झाले आहे.

शासकीय विभाग असी कामे करतात. कोणत्याही कार्यपद्धती अवलंबवितात आणि जनतेच कशा प्रकारे सेवा देतात हे त्या त्या विभामागेच स्वत हून सर्वांच्या माहितीसाठी प्रकाशित करावयाचे आहे.

गावामध्ये चालू असलेल्या बांधकामांचा दर्जा तपासणे शक्य झाले.

शासकीय योजनेतील लाभार्थीची निवड, निकष व यादी इ. बाबतची माहिती विचारता येते.

स्वस्त धान्य दुकानातील धान्य साठ्याची माहीती करुन घेता येईल.

शासकीय इस्पितळातील औषधांच्या साठ्यांबाबतही महीती मिळू शकेल

कोणत्याही कामाच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता प्राप्त होऊ शकेल.

जवळपास चालू अललेल्या योजनांच्या अंमल बजावणीची सत्य परिस्थिती तपासणे शक्या झाले.

वेगवेगळ्या खात्याच्या न्यायलयीन प्रशासकीय विभांगाच्या फाई-ल्सचे निरिक्षण करू शकाल.

परिसरातील चालू असलेल्या विकास योजनांची माहीती प्राप्त करू शकाल.

कुठल्याही चालू असलेल्या शासकीय कामतील प्रमाणित नमुना मागता येईल उदा. रस्त्याचे किंवा शाळेचे बांधकाम यांच्यामध्ये वापरण्यात येत आसलेल्या सामग्रीचा प्रमाणित नमूना प्राप्त करता येईलय.

अर्ज का नाकारण्यात आला याबाबत माहिती मिळविण्याचा पूर्ण अधिकार आहे.

माहितीच्या आधिकाराखाली माहीती मिळविण्याची प्रक्रिया

जर आपणास विशिष्ट माहिती प्राप्त करावयाची असे ल तर आपण संबंधित जन माहीती अधिकाऱ्याकडे अर्ज करावा. अर्जाची भाषा हिंदी किंवा इंग्रजी अथवा अर्ज ज्या क्षेत्रामध्ये करावयाचा असेल त्या क्षेत्रात राजभाषेमध्ये (उदा.महाराष्ट्रात मराठी भाषेतून अर्ज करता येईल) लेखील स्वरूपात करू शकतो हा अर्ज नेमका व नेटका (स्पेसिफिक- विनिर्दिष्ट असावा. हा अर्ज दाखल करतातनाच आपण जर आडवळणी गावामध्ये राहत असाल तर आपला अर्ज त्या विभागाच्या व त्या खात्याच्या सहाय्यक जन माहीती अधिकाऱ्याकडे सादर करावा संबंधित जन माहीती अधिकारी अर्जावर ३० दिवसात कार्यवाही करेल असे त्याच्यावर बंधन आहे माहितीच्या अधिकार कायद्यामध्ये माहीती मागविण्यासाठी अर्जाचा विहित नमुना नाही परंतू सोयीकरिता म्हणून शासनाने प्रसिद्ध केलेली माहीती मागविण्यासाठी कारावयाचा अर्जाचा नमूना पुढे दिला आहे. सोबत अर्जाची फी रू १०/ रोखीने अथवा बँकर्स चेकने अथवा डिमांड ड्राफ्ट ने अथवा कोर्ट फी स्टॅम्प लावून भरावयाचे आहे असे न केल्यास अर्ज अपूर्ण आहे असे समजण्यात येईल एका अर्जात शक्यतो एकाच खात्यासंबंधीची माहिती विचार ल्यास आपला अर्जावल माहीती अधिकाऱ्यास लवकर कार्यवाही करता येईल.

**माहीती मिळविण्याकरिता भरावयाचे शुल्क -**

आपणास अर्जांची फी म्हणून रू. १०/- (दहा रुपये) ही रोखीने अथवा बँकर्स चेकने (धनादेश) अथवा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्टने) अथवा कोर्ट फी स्टॅम्पच्या स्वरूपात भरता येईल माहिती अधिकाऱ्याकडे शुल्क भरल्याची पोचपावती मिळेल.

**कु. पाटील मिराबाई संतोष**

**एस.वाय.बी.ए. (राज्यशास्त्र विभाग)**

*****



१९७० च्या दशकाच्या मध्यात, भारताच्या १९७४ च्या अणुचाचणीनंतर, अण्वस्त्रक्षमतेच्या व्याख्येत बदल झालेला दिसून येतो. त्यापूर्वी प्रत्यक्ष अणुबॉम्ब बाळगणाऱ्या देशालाच अण्वस्त्रक्षमता असलेला देश म्हणून मान्यता मिळत होती. आज ही व्याख्या आधिक व्यापक झालेली दिसते. जर एखाद्या

राष्ट्राकडे अण्वस्त्र बनविण्यासाठी लागणारी साधनसामग्री असेल (त्यात युरेनिअम किंवा विशिष्ट क्षमतेच्या प्लुटोनिअमचा समावेश होतो.) तर ते राष्ट्र अण्वस्त्रक्षमता असलेले राष्ट्र आहे, असे मानले जाते. भारताने १९७४ मध्ये केलेल्या अणुचाचणीनंतर भारताने आपली क्षमता सिद्ध करुन दाखविली होती. साहजिकच भारताच्या आण्विक धोरणावर चर्चा होऊ लागली. भारताने आपली भूमिका ही अणुविज्ञानाचा शांततामय कार्यासाठी वापर करण्यावर आधारलेली आहे, हे वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

भारताच्य अणुसंशोधन कार्यक्रम स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू झाला. आणुतंत्रज्ञानाचा वापर केवळ शांततामय कार्यासाठी करण्याचा निर्धार भारताने सुरूवातीलाच जाहीर केला होता. त्या काळात अणुइंधनापासून वीजनिर्मिती करणे हे सर्वात महत्वाचे कार्य मानले जात होते. होमी भाभा आणि मेघानाद सहा या दोन शास्त्रज्ञांनी या क्षेत्रातील संशोधनाचा पाया तयार केला होता. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताचे आण्विकक धोरण हे दोन मूलभूत पायांवर आधारले गेले होते. अणुविज्ञानाचा शांततामय कार्यासाठी वापर करण्यासाठी संशोधन आणि अणुकार्यक्रमाबाबर स्वावलंबनासाठी प्रयत्न या भूमिकेचा दुसरा भाग म्हणजे अणुबॉम्बची निर्मिती न करण्याचा निर्धार आणि जागतिक निः शस्त्रीकरणाला सक्रिय पाठिंबा.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर यांनी १९५४ मध्ये जाहीर केलेल्या शांततेसाठी अणुया नवीन धोरणाचा फायदा भारताला बऱ्याच प्रमाणात झाला. या धोरणांच्या आधारे अमेरिकेने अणुतंत्रज्ञानाच्या प्रसारावर असलेली गुप्ततेची पकड बऱ्याच प्रमाणात काढून टाकली. असंख्य भारतीय शास्त्रज्ञ अमेरिकेत जाऊन अणुतंत्रज्ञानाचा अभ्यास करू लागले. १९५६ मध्ये कॅनडा आणि अमेरिका यांच्या मदतीने (CIRUS) हा संशोधन प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पासाठी मदत देताना हा प्रकल्प केवळ शांततामय कार्यासाठी वापरण्याची हमी भारताने दिली होती. पुढे १९७४ मधे अणुचाचणी करण्यासाठी भारताने या प्रकल्पातून निर्माण केलेले प्लूटोनिअम वापरले असे मानले जाते. कॅनडा आणि अमेरिका यांनी जे अणुतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताशी असलेले संबंध तोडले त्याचे मूळ कारण हेच होते. १९५६ च्या करारात शांततामय अणुचाचणीचे वर्गीकरण हे शांततेच्या कार्यात करता येते की नाही यावर चर्चा झालीच नव्हती.

भारताच्या आण्विक धोरणात जे सुरवातीच्या काळात बदल घडले ते प्रामुख्याने चीनच्या धोरणाच्या संदर्भात घडले. १९६२ चे भारत-चीन युद्ध आणि १९६४ ची चीनची अणुचाचणी या दोनही घटनांच्या भारताच्या धोरणांवरर परिणाम झालेला दिसून येतो. पंडित नेहरूंच्या शेवटच्या वर्षात या बदलाची सुरूवात झालेली दिसते. मात्र त्या बदलत्या धोरणाला जे निश्चित वळण मिळाले ते पंतप्रधान शास्त्रींच्या कारकीर्दीत चीनच्या अणुचाचणीचा पडसाद शास्त्रींवर उमटलेला दिसतो. चीनच्या या नव्या भूमिकेला कारकीर्दीत चीनच्या अणुचाचणीचा पडसाद शास्त्रींवर उमटलेला दिसतो. चीनच्या या नव्या भूमिकेला भारत काय प्रत्युत्तर देईल हा खरा मुद्दा होता. आपल्या सरकारचे धोरण स्पष्ट करताना शास्त्रींनी आपले पारंपारिक शांततेचे धोरण सोडले नाही. मात्र भारताचे अणुबॉम्बची स्पष्ट केले. त्यानंतर बोलतांना शास्त्रीनी शांततामय अणुकार्यक्रमाचा भाग म्हणून अणुचाचणी करण्याची देखील तयारी दर्शविली. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीला तोंड देऊन आपले धोरण आखण्याची तयारी भारताने दाखविली. हे करताना भारताने आपल्या धोरणांच्या संदर्भात एका वेगळ्याच प्रश्नाला हात घातला. तो प्रश्न म्हणजे भारताची अस्तित्वात असलेली क्षमता आणि भारताची जाहीर उद्दिष्टे या दोघापैकी कशाला महत्व द्यायेच?

भारताच्या या नवीन धोरणाला वेग मात्र आला नाही. पंतप्रधान शास्त्री आणि होमी भाभा, दोघेही १९६६ मध्ये स्वर्गवासी झाले. त्यानंतरही काही वर्षे भारतातील अंतर्गत राजकीय परिस्थिती तितकीशी स्थिर नव्हती. आंतरराष्ट्रीय खुला केला गेला. जी राष्ट्रे अण्वस्त्रधारी नाहीत त्यांनी यापुढे अण्वस्त्र तयार करु नयेत, तसे झ ाले तर जगातील अण्वस्त्रधारी राष्ट्रांची संख्या जी १९६८ मध्ये पाच होती, ती वाढणार नाही हा या कराराचा मूळ हेतू होता. हा करार एकतर्फी आहे, अण्वस्त्रधारी राष्ट्रांवर कोणतीच बंधने करार घालीत नाही, या तात्विक मुद्यावर भारताने या कारारावर स्वाक्षरी करण्याचे नाकारले.

१९७४ मध्ये भारताने जी अणुचाचणी केले, त्यासंबंधीत निर्णय १९७१-७ च्या सुमारास झाला असावा असे वाटते. अशियातील आंतरराष्ट्रीय परिस्थितीत या दरम्यान काही महत्वाचे बदल घडून आले होते. दक्षिण आशिआई पातळीवर पाकिस्तान आणि चीन यांचे जवळेचे संबंध निर्माण झाले होते. आशियाई क्षेत्रात अमेरिकेने चीनशी संबंध प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरवात केली होती. रशियाने जी भारत आणि पाकिस्तान यांच्या मध्ये समांतर भूमिका घेतली होती ती आता भारताच्या बाजूने झुकण्यास सुरुवात झाली होती. १९७१ च्या युद्धानंतर परिस्थिती आधिक स्पष्ट झाली.या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला मदत केली, त्याचबरोबर हिंदी महासागरात आपली विमानवाहू नौका एंटरप्राईज पाढवून भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे भारताला रशियाकडून अपेक्षित मदत सहजपणे मिळाली नाही. बांगला देशाच्या एकून प्रश्नाच्या संदर्भात रशियाला भारताच्या मतांशी सहमत करुन घेण्यास भारताला रशियावर बराच दबाव आणावा लागला. या आंतरराष्ट्रीय परिस्थितीला अनुसरून भारताने आपले धोरण नव्याने आखले. १९७२ मध्ये लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान इंदिरा गांधीनी भारत शांततामय अणुचाचणीच्या संदर्भात संशोधन करीत असल्याचे नमूद केले. पुढे १९७३ मध्ये पुन्हा याचा उल्लेख केला गेला. भारताचे धोरण आता एक विशिष्ट दिशा घेत असल्याचे स्पष्ट झाले. भारत अणुविज्ञानाचा उपयोग शांततसाठी करील त्याचप्रमाणे अणुचाचणी ही शांततामय उपयोगाच्या व्याख्येत समविष्ट होते.

१८ मे १९७४ रोजी भारताने पोखारान येथे अणुचाचणी केली. त्यानंतर लोकसभेत या चाचणीविषयी निवेदन् करताता श्रीमती इंदिरी गांधीनी ही चाचणी म्हणजे अणुविषचक संसोधनाचाच एक भाग आहे हे स्पष्ट केले. भारतात हे संशोधन् अणुतंत्रज्ञानाचा शांततेसाठी उपयोग करण्यासाठी म्हणून केला जात आहे. श्रीमती इंदिरा गांधींनी असेही प्रतिपादन केले की, ही चाचणी करुन भारताने कोणत्याही आंतराष्ट्रीय कराराचे उल्लंघन केलेले नाही . इतर राष्ट्रांच्या प्रतिक्रियेची नोंद घेताना अमेरिका, कॅनडा आणि पाकिस्तानचा विशेष उल्लेख केला गेला. कॅनडाने भारताकडून CIRUS च्या कराराचा भंग झाला आहे. अशी भूमिका घेतली आणि भारताशी अस्तित्वात असलेल्या सर्व आण्विक क्षेत्रांतील सर्व रहकार्य बंद केले. हे संबंध पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी भारत प्रयत्नशील असल्याची नोंद घेण्यात आली प्रत्यक्षात मात्र आजपर्यंत हे सहकार्य पुन्हा प्रस्थापित करण्यात यश आलेले नाही. श्रीमती गांधीनी पाकिस्तानला एका विशेष पत्राद्वारे भारताची भूमिका स्पष्ट केली. त्यात ही चाचणी म्हणजे अण्वस्त्र बनविण्याची नांदी नव्हे हे स्पष्ट करण्यात आले होते.

पोखराणच्या चाचणीनंतर मात्र भारताचे आण्विक धोरण जास्त स्पष्ट होत गेलेले आढळून येते शास्त्रींच्या काळातील आण्विक धोरणाची व्याख्या आता जास्त व्यापक झाली होती. भारताचे धोरण हे

पूर्वीच्याच शांततामय वापराच्या आराखड्यात बसवले होते. त्याचप्रमाणे हे धोरण राष्ट्रीय सुरक्षिततेच्या गरजांना धरून आणि प्रत्येक काळातील भू-राजकीय परिस्थितीला अनुसरून आखले जाईल हे देखील स्पष्ट होते. मात्र आता हे धोरण आखताना भारताची अण्वस्त्र क्षमता ही नवीन बाबा होती. भारताने अणुचाचणी करून आपल्या क्षमतेचे जाहीर प्रदर्शन केले होते. दुसरा प्रश्न भारताच्या उद्दिष्टांचा भारत एक आण्विक क्षमता आसलले राष्ट्र असेले तरी ते शांततेचा मार्ग स्वीकारणारे राष्ट्र आहे, भारत अणुबॉम्ब बनविणार नाही. भाताच्या धोरणाचे हे समीकरण गेल्या काही वर्षात पाकिस्तानने बदलून टाकले आहे. भारताने ११ मे व १३ मे १९९७ रोजी पाच अणुचाचण्या घेतल्यात.

पाकिस्तानचा आण्विक कार्यक्रम हा भारताच्या अणुचाचणीच्या बऱ्याच पूर्वा सुरू झाला होता. झुल्फिकार अली भुट्टो या कार्यक्रमाचे प्रमुख शिल्पकार होते. पोखरान चाचणीनंतर या कार्यक्रमाला विशेष वेग आलेला दिसतो. पाकिस्तानची या क्षेत्रातील प्रगती भारताच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न करणारी आहे हे उघड सत्य आहे. भारताने चीनच्या अण्वस्त्र उत्पादनाला प्रत्युतर म्हणून आपल्या धोरणात बदल केला होता.आज पाकिस्तानच्या संभाव्य आण्विक धोक्याला भारक काय प्रत्युत्तर देईल यावर बरीच चर्चा होत आहे.

भारताच्या प्रतिक्रेयेच्या संदर्भात दोन प्रश्न उपस्थित होतात एक पाकिस्तानने आज आपल्या आण्विक कार्यक्रमात कितपत प्रगती केली आहे, पाकिस्तानला अण्वस्त्र बनविण्याची क्षमता आहे काय? आणि जर अशा स्वरूपाची क्षमता पाकिस्तानला प्राप्त झाली तर पाकिस्तान त्यासंबंधी जाहीर निवेदन अथवा प्रदर्शन (उदाहरणार्थ, अणुचाचणी) करील काय? दुसरा प्रश्न भारताच्या प्रतिक्रियेचा आहे. पाकिस्तानने जर आपली क्षमता जाहीर केली किंवा त्याचे प्रदर्शन केले तर भारत त्यावर काय भूमिका घेईल?

पाकिस्तानच्या अण्विक क्षमतेबद्दल सध्या बरीच चर्चा होत आहे. निश्चित पुरावा जरी नसला तरी इतके नक्की सांगता येईल, आणुबॉम्ब सध्या बरीच चर्चा होत आहे, निश्चित पुरावा जरी नसला तरी इतके नक्की सांगता येईल, अणुबॉम्ब बनविण्यासाठी लागणारे शुद्ध युरेपियम बनविण्याचे तंत्रज्ञान आहे. परंतु अशा युरेनियमचा कितपत साठा आहे हे वादग्रस्त आहे. पाकिस्तानने आपल्या या प्रयत्नात लीबीया आणि चींनची मदत घेतल्याचे काही पुरावे आहेत. मात्र सरकारी पातळीवर अजूनही पाकिस्तान आपल्या आण्विक कार्यक्रमाला यश आल्याचे मान्य करीत नाही. पाकिस्तानची अधिकृत भूमिका अशी आहे की त्याच आण्विक कार्यक्रम हा शांततामय आहे आणि पाकिस्तान अणुबॉम्ब बनविणार नाही. पाकिस्तान आपल्या क्षमतेचे जाहीर प्रदर्शन करणार नही, असे स्पष्ट दिसते. पाकिस्तान भारताप्रमाणेच आपले धोरण ठेवम्याची शक्याता आहे. म्हणजे अण्वस्त्रक्षमता निर्माण करणाचे प्रयत्न करायचे जमल्यास ती क्षमता प्राप्त करायची परंतु अशा क्षमतेचे प्रदर्शन करायचे नाही ( भारताप्रमाणे). प्रत्यक्ष अणुबॉम्ब तयार न करता पाकिस्तानला दुहेरी फायदा मिळू शकतो. आंतरराष्ट्रीय सत्तासमतोलाला धक्का न देता पाकिस्तानचे सध्याचे असलेले हितसंबंध जपता येतात. त्यात अमेरिकेकडून मिळत असलेलल्या लष्करी मदतीचा सहभाग आहे. दुसरे म्हणजे अण्वस्त्रक्षमतेच्या जोरावर दहशत निर्माण करता येते.

परंतु जर काही कारणाने पाकिस्तानने आपल्या आण्विक क्षमतेचे जाहीर प्रदर्शन केले तर भारत त्याला काय प्रत्युत्तर देईल हा महत्त्वाचा प्रश्न उरतोच. अशा परिस्थितीत भारत सरकारवर अण्वस्त्र बनविण्याच्या बाजूने प्रचंड राजकीय दडपण येणे साहजिक आहे.

भारताकडे दोन टोकाचे पर्याय उरतात एक तर अणुबॉम्ब करण्याचा निर्णय घेणे किंवा आहे ती परिस्थिती मान्य करून गप्प बसणे. या दोन्ही पर्यायांचे परिणाम गंभीर स्वरूपाचे असतील यात शंका नाही. म्हणून या दोन्ही व्यतिरिक्त एक तिसरा पर्याय मान्य होण्याची शक्यता अधिच वाटते. हा पर्याय हे गृहीत धरतो की, अंतिम निर्णय भरत किंवा पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांना प्रत्यक्षात अणुबॉम्ब बनविण्याची इच्छा नाही, त्यांचा तसा उद्देश नाही. अण्वस्त्रक्षमतेचा दबाव आणण्यासाठी वापर करणे, त्याचबरोबर इच्छा नाही, त्यांचा तसा उद्देश नाही. अण्वस्त्रक्षमतेचा दबाव आणण्यासठी वापर करणे, त्याचबरोबर शांततेच्या धोरणाचे नैतिक दडपण आणणे या धोरणात असलेला मूलभूत फायदा प्रत्यक्ष बॉम्ब बनवून घालविण्यात अर्थ नही. हे जर खरे असेल तर पाकिस्तानच्या क्षमतेच्या प्रदर्शनानंतर दडपण येईल. अशा तऱ्हेचा एक छोटासा समझोत झिया-उल-हक आणि राजीव गांधी यांच्यामध्ये १९८५ मध्ये झाला आहे. जरी प्रत्यक्षात त्याचे करारात रुपांतर झाले नसले, तरी एकमेकांच्या आण्विक प्रकल्पांपर कदाचित भारत दुसरी अणुचाचणी करेल ज्याकरवी भारत पाकिस्तानच्या पुढे असल्याचे जाहीर होईल. मात्र दूरदृष्टीने विचार कारता भारत आणि पाकिस्तानला अशा समझोत्यी शिवाय पर्याय दिसत नाही.

**कु. निलीमा भावराव शेवाळे**

**(संरक्षण आणि सामरिक शास्त्र)**

*****

**आवड आणि आत्मविश्वास असेल तर, कोणतीही गोष्ट अशक्य नाही.**



युद्धकार्यवाहीमध्ये मानसशास्त्रीय सिद्धान्ताचा शस्त्रास्त्रे म्हणून उपयोग करण्याच्या प्रक्रियेस मानसशास्त्रीय युद्धतंत्र म्हणता येईल. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी हिंसात्मक युद्धामध्ये किंवा शीत युद्धमध्ये या युद्धतंत्राचा उपयोग राजकीय प्रचार युद्ध, आर्थिक युद्ध, इलेक्ट्रॉनिय युद्धतंत्र, रासायनिक जौविक युद्ध इत्यादी युद्धतंत्राबरोबर केला जातो.

"युद्धक्षेत्रात मानसशास्त्राच्या प्रात्यक्षिकाचे स्वरूप आणि त्याच्या काही भागाचा प्रत्यक्ष प्रयोग किंवा राजकीय, आर्थिक आणि सैनिकी कार्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे मानसशास्त्रीय युद्धतंत्र" व्यापक अर्थाने या प्रकारे स्पष्टीकरण करता येईल. थोडक्यात, शत्रूच्या विरूद्ध प्रचारचा उपयोग आणि निरनिराळ्या प्रकारच्या सैनिक, आर्थिक किंवा राजकीय उपयोग, ज्याच्या प्रचारासाठी मोठी शक्ती म्हणून उपयोग होतो. त्याला मानसशास्त्रीय युद्धतंत्र संबोधता येईल.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण करण्यापूर्वी विमानातून प्रचारपत्रके घेतल्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. सप्टेबर १९३९ पूर्वी नाझी जर्मनीने केलेला प्रदेश विस्तार म्हणजे मानसशास्त्रीय युद्धतंत्र वापरून स्वार्थ व राजकीय उद्दिष्टे साध्य करून घेतलेले बोलकेच आहे.

मानसशास्त्रीय युद्धतंत्रामध्ये सैनिकांच्या शत्रूच्या प्रदेशातील लोकांच्या मनोधैर्यावरच आघात

केला जातो. युद्धाचे आणि संघर्षाचे मूळ मानसिक आणि जैव प्रेरणात सापडते त्यामुळेच लढा देण्याचा आणि प्रतिकार करण्याचे मनधैर्यच उद्ध्वस्त करणे हे मानसशास्त्रीय युद्धतंत्राचे खरेखुरे उद्दिष्ट असते. हिंसात्मक युद्धतंत्राचे शत्रूचे लोक आणि अधिभौतिक संपत्ती साधने नष्ट होतात आणि त्यांचे मनोधैर्य खच्ची झाल्यावर ते शरण येतात. मानसशास्त्रीय युद्धामागे व्याक्ती, समाज व राष्ट्र यांच्यामधील भीती, संमोह, अज्ञान, काम, क्रोध, लोभ, दंभ, मत्सर आणि अहंकार तसेच जगण्याची भावना या मानसिक व जैव प्रवृत्तींचा आणि मनोव्यापारांचा कौशल्याने उपयोग करून त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास भाग पाडण्याचा हेतू असतो. म्हणजे शत्रूचे मन हे यात आघत -लक्ष असून त्याचा मानसिक पराभव करणे हे त्या मागील ध्येय असते. पाठपुरावा युद्ध (War of Persuation) किंवा संभ्रम युद्ध (War of Nerves) किंवा रक्तहीन युद्ध (Bloodless War) असे सुद्धा या युद्धप्रकारास संबोधण्यात येते. हिंसात्मक युद्धाबरोबर या युद्धतंत्राचाही अवलंब केला जातो.

**उद्दिष्टे ( Objectives)**

मानसशास्त्रीय युद्धतंत्राची उद्दिष्टे पुढीलप्रमाने आहेत.

१) शत्रूच्या प्रदेशात प्रचलित पक्ष, सरकारविरूद्ध क्रांती करण्याची भावना जोपासणे व वाढविणे.

२) शत्रूचे सैनिक, अधिकारी, जनता, पुढारी, राज्यकर्ते इत्यादींच्या युद्धाबद्दलचा उत्साह कमी करणे किंवा त्यांना युद्धापासून परावृत्त करणे.

३) शत्रूच्या उत्साहास, शौर्य शक्तीस निरनिराळ्या मार्गाची कमी करून त्यांना शक्तिहिन करणे.

४) शत्रूचे मनोधैर्य खच्ची करणे.

५) विनाकरण हानी टाळून युद्ध त्वरेने थांबविण्यासाठी शरण जाणेच शहामपणाचा मार्ग आहे. हे शत्रू लोकांवर बिंबविणे.

६) स्वकीयांवर युद्धाची आवश्कता आणि शुद्धता बिंबविणे.

७) स्वकीयांना शत्रुविरुद्ध, अन्यायाविरुद्ध भडकविणे व प्रतिकूल परिस्थितीतही युद्ध सुरू ठेवणे कसे फायदेशीर आहे हे पटविणे.

८) आपण करणारे युद्ध धर्म युद्ध च असल्यामुळे यश आपणासच मिळणार याची खात्री देऊन सक्रीय सहानूभूती मिळविणे.

९) शत्रूची आपल्याविरूद्ध कुणीही संगमनत करणार नाही किंवा तटस्थ राहतील अशी खबरदारी घेणे.

१०) योग्य मुस्तद्देगिरीमुळे जागतिक जनमत आपले बाजूने वळविणे.

११) तटस्थ राष्ट्रांना तटस्थ राहण्यासाठी प्रयत्न करणे किंवा त्यांचे मित्रत्व पत्करणे.

१२) शत्रूच्या सशस्त्र सैन्यात आणि त्याचा मित्रराष्ट्रांच्या सहकार, लोकांमध्ये परस्परविरूद्ध अविश्वास आणि वाद निर्माण करणे.

या युद्धतंत्राच्या संदर्भात प्राचीन चीनी तत्वज्ञ स्वुन-ज हा त्याचा युद्ध या ग्रंथात स्पष्ट करतो की सर्व युद्धतंत्राची मूळ बैठक फसवणूक हीच असते. सेनापतीचे मुख्य लक्ष शत्रू सेनापतीचे मन असते. लढाईची पूर्व तयारी म्हणजे शत्रूच्या मनावर हल्ला करणे. त्याला फसवून आणि त्याच्या मनात गोंधळ निर्माण करून त्याची निर्णयक्षमता अस्थिर करणे.

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ कौटिल्य यानेही आपल्या अर्थशास्त्रात कूट-युद्धाच्या विवरणामध्ये मानसशास्त्रीय युद्धतंत्राचे अप्रत्यक्ष वर्णन केलेच आहे.

**इतिहास (History)**

मानसशास्त्रीय युद्धतंत्राच्या जनकाविषयी निश्चितपणे सांगता येणार नाही. मानवी संघर्ष, त्याची प्रक्रिया, परिणाम, आणि त्या संघर्षाचा शेवट यांचे मूळ मानसिकच असेत. उदा. मानसिक दृष्टिकोन, स्वभाविषेश व भावना, मूल्यकल्पना, अस्मिता

इत्यादी. उदा. आरडाओरड करणे, शिवीगाळ करणे, तोंडाला व अंगाला रंग फासणे, दाढीमीशा  वाढविणे, शत्रूविरूद्ध आक्राळ-विक्राळ भयानक शस्त्रे उपयोगात आणणे, चित्र-विचीत्र भडक पोशाख धारण करणे, रणवाद्ये झोडपणे इत्यादी. शत्रूच्या सैन्यापेक्षा आपले सैन्यपेक्षा  आपले सैन्य जास्त आहे, युद्ध नेते आणि योद्धे युद्धप्रविण व अजिंक्य आहेत शत्रू नेते व योद्धे कमकुवत आहेत, आपली शस्त्रास्त्रे भयानक संहारक आहेत, आपला साठा विपूल प्रमाणात आहे, आपण न्यायासाठी लढत आहेत त्यामुळे यश आपल्याच बाजूने राहील इत्यादी स्वरूपाचा प्रचार करण्याची पद्धती जुनीच आहे. जुन्या इतिहासातही तशी उदाहरणे आढळतात. उदाहरणार्थ, दाशराज्ञ युद्ध, कौरव-पांडव युद्ध, यहूदी-फिलीस्तानी युद्धे, धर्मयुद्धे ग्रीय-ट्रॉय युद्ध इत्यादी.

प्राचीन ग्रंथातूनही या युद्धतंत्राचा अप्रत्यक्ष उपायोग केला गेला असल्याचा उल्लेख आढळतो. अथर्ववेदामध्ये संमोहनास्त्रादींचा वापर मानसशास्त्रीय स्वरूपाचाच दाखविला आहे. भागवद्‌गीतेच्या पहिल्या अद्यायावरील ज्ञानदेवांच्या भाष्यांमध्ये मानसशास्त्रीय युद्धतंत्राचे दाखले मिळतात, तर गीतेतील युद्धपरान्मुख व मोहग्रस्त अर्जुनाला श्रीकृष्णाने युद्धासाठी कसे प्रेरित केले हे अभ्यासण्यासारखे आहे. श्रीकृष्णाचा उपदेश ऐकून अर्जुनाचा मोह नष्ट होऊन त्यास सृती  प्राप्त झाली. मुहंमद पैगंबराने मक्का मिळविण्यासाठी मानसशास्त्रीय युद्धतंत्राचा उपयोग केला असे काही मुस्लिम इतिहास तज्ञांचे म्हणणे आहे, ३४ तर १६२२ मध्ये रोमन कॅथालिक पंथाने धर्मप्रसारासाठी जी संस्था स्थापन केली, तिच्यावरून प्रॉप गँडा (प्रचार) ही संज्ञा रूढ झाली असल्याचे आढळते. श्युसिडीडीझच्या इतिहासात व डिमॉस्थिनीझच्या प्रवचनातही तत्कालीन प्रचारतंत्राची माहिती मिळते. गौतम बुद्ध कन्फुशस यांनीही सत्यकथन, प्रभावी वक्तृत्व, लिखाण, भाषा इत्यादी मुद्यावर विवेचन केले आहे. देवकीपुत्र कृष्ण हा तुझा शेवट करणार ही आकाशवाणी ऐकून कंस भ्रमिष्ट झाला व त्याचा शेवट झाला ही पौराणिक कथा विचार करण्यासारखी आहे.

चंगीझखानाने शत्रूच्या मानसिक अधपानातूनच यश मिळवेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगल किंवा विजापूरच्या सुलतानाला युद्धापासून पारवृत्त करण्यासाठी जे डावपेच लढविले होते त्यात मानसशास्त्रीय सिद्धान्ताचे दर्शन घडते. मराठ्यांच्या स्वांतत्र्ययुद्धात धनाजी जाधव व संताजी घोरपडे मोंगली सैन्याला मनावर असाच केला होता, त्यामुळे शत्रूच्या घोड्यांनाही धनाजी-संताजी पाण्यात दिसत असे म्हटले आहे. लोकांच्या विथ्थकथावरी श्रद्धेचा फायदा घेऊन परकीयांनी त्यांच्यावर विजय मिळविल्याची अनेक उदाहरणे आहेत.

पहिल्या महायुद्धात आणि दुसऱ्या महायुद्धात तर मानसिक युद्धतंत्राचा उपयोग पदोपदी केलेला आढळतो. जर्मनीच्या गोबेल्सने तर प्रचारयुद्धाचे नेतृत्वच स्वीकारले. १९३९ सालापूर्वी जर्मनीच्या अंतर्गत संघटनेसाठी त्याने स्पष्ट केले की, जर्मनीचा वंश हा सर्वश्रेष्ठ वंश आहे व तोच जगावर राज्य करणार ऐतिहासिकदृष्ट्या हिटलर हाच सर्वश्रेष्ठ जर्मन आहे, म्हणून त्याच्यासाठी बलिदान करणे हेच श्रेष्ठ कर्तव्य आहे. व्हर्सायच्या तहाचा धिक्कार, जर्मनीच्या पराभव म्हणजे जगाचा पराभव याशिवाय शत्रू राष्ट्रविरूद्ध केलेल्या प्रचारातही त्याने पुढीलप्रणाणे प्रचारतंत्र अवलंबिले  तेथील प्रजेत वांशिक आणि धार्मिक द्वेष-निर्मितीचे भेद पाडणे, शासनाविरूद्ध असंतोष पेटविणे युरोपिय संस्कृतीचा  रक्षणासाठी जर्मनी रशियाविरूद्ध लढत आहेत व अमेरीका आणि ब्रिटन हे स्टॅलिनचे बगलबच्चे  आहेत. इत्यादी युद्धामध्ये विजय दूर जाऊ लागताच त्याने स्पष्ट केले की युद्ध अखेरपर्यंत न लढल्यास जर्मनीची तोडफोड होईल व

त्याला ज्यूचे दास व्हावे लागेल. रशियाची साम्यवादी निकृष्ट संस्कृती व शासन पत्करावे लागेल, तथापि दोस्तराष्ट्रांचा घनघोर बॉम्ब हल्ल्यामुळे व त्यातून टाकलेल्या पत्रकामुळे नाझी  सरकार संपूर्णत विकृत व खोटा प्रचार करीत असल्याचे जर्मनांना कळून चुकले होते.

ब्रिटनच्या महायुद्धतील प्रचार बहुतांशी सत्य वास्तव होता. पराभव कबूल करूनही आशावाद, जोरदार प्रयत्न, स्वार्थत्याग व अंतिम विजयाची खात्री अशा भरीव मुद्यावर त्यांचा भर असे. विस्टन चर्चिलची जगाला उद्देशून केलेली भाषणे उल्लेखनीय आहेत. अमेरिकेच्या युद्धप्रचार सुद्धा सत्य घटनेवर आधारित असल्याने विश्वासार्ह ठरला शत्रुसैनिकांना उद्देशून केलेल्या जपानी प्रचारात शत्रूसैनिकांच्या लौंगिक भावना व ऐषारामी जीवन इत्यादी मुद्दे असत. उदा. लैंगिक भावना चेतविणे किंवा ऐषारामी जीवनाची आकर्षणे दाखविणे इत्यादी. जपानने याहीपुढे जाऊन प्रचार केला की, अमेरिका , फ्रान्स व ब्रिटन ही पिळवणूक करणारी साम्राज्यवादी राष्ट्रे आहेत. आशियाईकरिता आशिया या तत्त्वाला धरूनच जपान पाश्यात्याविरूद्ध लढत आहे. सर्वांना स्वराज्य  स्वातंत्र्य मिळेल आणि समतेने वागविण्यात  येईल इत्यादी .

**कु. भदाणे प्रियंका संजय**

**(संसक्षण आणि सामाजिकशास्त्र विभाग)**

*****






इ.स. १८५७ नंतर ब्रिटिशांची फुटीरतावादी नीती व हिंदू-मुस्लिमांमधील मतभेदातून हिंदू-मुस्लीम अलगतवादाला चालना मिळाली. यातूनच इ.स.९०६ मध्ये मुस्लीम लीगची स्थापना झाली. यानंतर उघडणे हिंदू-मुस्लीमांमध्ये वाद उफाळू लागले होते. तसेच १९०९ च्या  मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने मुस्लिमांना मिळालेले स्वतंत्र मतदारसंघ, ब्रिटिश शासनाचे हिंदूविरोधी धोरण, यातच हिंदूंचे होत असलेले धर्मांतर अशी एकूणच परिस्थिती लक्षात घेता हिंदूचेही संघटन आवश्यक आहे असे काही हिंदूत्ववादी नेत्यांना वाटू लागले होते.

**हिंदू महासभेची स्थापना(१९१५)**

हिंदूंच्या रक्षणासाठी व संघटनेसाठी पं. मदन मोहन मालवीय, डॉ. मुंजे या नेत्यांनी हिंदूंच्या संघटनावर भर देण्यास सरुवात केली. तसेच पंजाबमधील लाला लजपतराय, लाल लालचंद, लाला हंसराज या नेत्यांनाही हिंदूसाठी एक स्वतंत्र व्यासपीठ असावे असे वाटत होते. हिंदू महासभेचा उदय हा इ.स. १९०७ च्या दरम्यान पंजाबमध्ये झालेल्या आहे. कारण ब्रिटिशांच्या मुस्लिमांना जवळ करण्याच्या धोरणाने पंजाबमधील अल्पसंख्याक हिंदूना बहुसंख्या मुस्लिमांची भीती वाटत होती. इ.स. १९०९ पासून पंजाबमध्ये पंजाब प्रांतिक हिंदू महासभेची वार्षिक अधिवेशने भरण्यास सुरवात झाली होती. लाला हरचंद यांच्या

अध्यक्षतेखाली इ.स. १९०९ मध्ये लाहोर येथे पंजाब प्रांतिक हिंदू परिषद भरली होती. या वेळी लाला हरजंद यांनी मत मांडले की, आपण सर्व हिंदू आहेत ही भावना असली भेद असता कामा नये. या अधिवेशनानंतर दरवर्षी एक अशी ६ अधिवेशने लागोपाठ भरली. पंजाबमधील हिंदू नेत्यांच्या पुढाकाराने इ.स. १९१५ मध्ये हरिद्वार तेथील अधिवेशनात अखिल भारतीय हिंदू महासभेची स्थापना करणाय आली त्याचवेळी हिंदू महासभेची ध्येये, उदिष्टे व घटना स्पष्ट करण्यात आली. जो आपणास हिंदू म्हणवून घेत असेल तो किंवा भारतात जन्मलेल्या कोणत्याही धर्माच्या अनुयायी यात सनातनी, आर्य समाज, शीख, बौद्ध, जैन, ब्राह्यो इत्यादींचा अंतर्भाव होतो. अशी हिंदूची व्याख्या हिंदू महासभेने केली होती.

हिंदू महासभेचा सदस्स होण्यासाठी १८ वर्षे झालेली कोणत्याही हिंदू व्यक्तीस महासभेचा सदस्य येत होते.परंतू त्याला महासभेचे ध्येय व उद्देश मान्य असावेत तसेच वार्षिक चार आणे देणगी त्याला द्यावी लागत होती. हिंदु माहसभेने ध्वजही निर्माण केला. ध्वज हा भगव्या रंगाचा आहे. त्यावर उभे कुंडलिनीचे आणि आडवे कृपाणाचे चित्र आहे. दोहोच्या मध्ये स्वस्तिक आहे.यासोबतच संस्कृतनिष्ठ हिंदी ही राष्ट्रभाषा व देवनागरी लिपी ही राष्ट्रलिपी म्हणून स्वीकारली.

हिंदू महासभेला पं. मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, मोतीलाल घोष, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सच्चिदानंद सिंह, राजा नरेंद्रनाथ, डॉ मुंजे, न.चि. केळकर, रामानंद चॅटर्जी, विजय राघवाचार्य, भाई परमानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी असे राष्ट्रीय स्तरावरील ज्येष्ठ श्रेष्ठ नेतृत्व लाभले होते.

**ध्येय व उद्दिष्ट्ये**

हिंदू वंश, हिंदू संस्कृती आणि हिंदू सभ्यता यांचे जतन व संवर्धन करणे आणि त्याकरिता कायदेशीर मार्गाने हिंदुस्तानला पूर्ण स्वराज्या अर्थात राजकीय स्वातंत्र्य न्याय्य मार्गाने मिळविणे.

हिंदू समाज एकत्रित करण्यासाठी सर्व अंगोपांगाना संघटित करणे.

हिंदूच्या हितसंबंधांचे जतन व संवर्धन करणे.

धर्मांतर केलेल्या हिंदूना परत हिंदू धर्मात घेण्यासाठी शुद्धीकरण मोहीम चालविणे.

गोहत्या बंदी व गोरक्षणाचा पुरस्कार करणे.

हिंदू महिलांच्या प्राचीन आदरर्शांचे पुनरूज्जीवर करून त्यांचा पुरस्कार करणे.

अनाथ, निराधार मुले व स्त्रियांराठी अनाथालये व महिलाश्रम स्थापन करणे. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी अस्पृश्य लोकांची सर्वांगीण उन्नती करणे.

हिंदू तरूण हा विधायक मार्गाकडे वळावा यासाठी व्यायामशाळा, लष्करी शिक्षणाच्या शाळा व स्वयंसेवक दले उभारणे.

हिंदु व अन्य धारणीतील लोकांमध्ये सलोखा निर्माण करणे. सुशासित व स्वंयशासित भारत देश निर्माण करण्यासठी त्यांच्याशी बंधुभावाने वागणे.

तसेच हिंदू समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय हितसंबंधाचा व अधिकाराचा पुरस्कार करण्याकरिता विविध उपाययोजना करणे.

एकूण हिंदू धर्म, संस्कृती यांचे जतन, संवर्धन व संरक्षण व्हावे यासाठी हिंदू महासभेने विविध उपाययोजना व निरंतर प्रयत्न करणे असे सर्वसाधारण उद्दिष्टे हिंदू माहसभेचे होते.

**हिंदू महासभेची वाटचाल / कार्ये**

इ.स. १९१५ मध्ये हरिद्वार येथे अखिल भारतीय हिंदू माहासभेची रीतसर स्थापना झाली. स्थापनेनंतर एप्रिल १९१५ मध्ये हिंदू महासभेचे पहिले अधिवेशन कासीम बाजारच्या महाराजांच्या

अध्यक्षतेखाली आयोजित केले होते. हिंदू महासभेच्या अधिवेशनाला लो.टिळक, म.गांधी, डॉ. राजेद्र प्रसाद, तेजबहादूर सप्रे  हे नेते भेट देत होते.परंतु ते हिंदू-मुस्लीम  लीगमुळे वांशिक व धार्मिक  वाद तात्र होत आहे. भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने ते चांगले नाही. इ.स. १९१६ च्या लखनौ अधिवेशनात काँग्रेस व मुस्लीम यांच्यात झालेल्या लखनौ करारावर हिंदू महासभेच्या नेत्यांनी टीका केली. लाला लजपतराय यांनी इ.स. १९२२ च्या दरम्यान शुद्धीकरण मोहिमेस सुरूवात केली व हिंदूच्या संघटनेवर भर दिला.

पं. मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली ऑगस्ट १९२३ मध्ये हिंदू  महासभेचे अधिवेशन काशी येथे आयोजित केले होते. या अधिवेशनात हिंदू महासभेच्या शाखा देशभर स्थापन करण्यात याव्यात, असा निर्णय घेण्यात आला. यानुसार महाराष्ट्रात इ.स. १९२३ मध्ये नागपूर व मुंबई आणि इ.स. १९२४  मध्ये रत्नागीरी व पुणे हिंदू महासभेची स्थापणा केली गेली, परंतु महाराष्ट्रातील ब्राह्मेतर समाजाचे कार्यकर्ते हे हिंदू महासभा ही ब्राह्मणांचीच सभा आहे असे मत मांडत होते. त्यामुळे महाराष्ट्रात हिंदू महासभेचा फारसा प्रचार, प्रसार झाला नाही.

**कु. खैरनार कवीता साहेबराव**
**टी.वाय.बी.ए**

*****






**आझाद हिंद फौजेची स्थापना**

रासबिहारी बोस हे क्रांतिकारक होते. इ.स. १९१५ मध्ये भारतातून ते वास्तव्य करणाऱ्या भारतीयांना संघटित करून इ.स. १९२४ मध्ये इंडियन इंडिपेडन्स लीग नावाची संघटना त्यांनी स्थापन केली होती. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर जपानने अमेरिच्या पर्ल हार्बर या नाविक तळावर हल्ला करून दोस्त राष्ट्रांविरूद्ध पुकारले. महायुद्धात इंग्लंडच्या बाजूने लढणाऱ्या हिंदी शिपायांना कैद करून जपानने त्यांना तुरूंगात टाकले होते. जपानच्या हाती सापडलेल्या अशा ४०,००० हिंदी युद्धकैद्यांना संघटित करून रासबिहारी बोस यांनी कॅप्टन मोहनसिंग यांच्या सहकार्याने व जपानच्या मदतीने मार्च १९४२ मध्ये आझाद हिंद फौजेची स्थापना केली. या सेनेचे नेतृत्व पुढे त्यांना नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे सुपूर्द केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नेतृत्व मिळताच आझाद हिंद सेनेत नवचैतन्य निर्माण झाले. नेताजींनी आझाद हिंद फौजेच्या साहाय्याने भारताचे दर ठोठावले होते, म्हणून आझाद हिंद फौज व नेताजींची कामगीरी अतिशय महत्वाची मानली जाते.

**नेताजींचे पूर्ववृत्त**

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओरिसा प्रांतातील कटक येथे  झाला. त्यांचे पूर्ण नाव सुभाषचंद्र जानकीदास बोस असे होते तर आईचे नाव प्रभावती होते. सुभाषचंद्र बोस हे

लहानपणापासून हुशार, देशभक्त व धाडसी वृत्तीचे होते. शालेय अभ्यासात ते नेहमी अव्वल येत असत. कलकत्ता विद्यापीठातून त्यांनी पदवी संपादन केली.त्यांनतर ते इ.स.१९२० मध्ये आय.सी.एस.ची परीक्ष प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या परीक्षेत त्यांचा चौथा क्रमांक आला होता. याच काळात गांधीजींना असहकार आंदोलन सूरू केले होते.या आंदोलनात नेताजींनी सहभाग घेतला. नेताजी काँग्रेस पक्षाचे कार्य कर्ता बनले. पुढे बंगालचा प्रवक्ता म्हणून राष्ट्रीय सभेकडून त्यांची निवड करण्यात आली. नेताजी सुभाषतंद्र बोस हे दोन वेळा काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले होते. (हरिपूर -१९३८, त्रिपुरा -१९३९) पुढील काळात नेताचींचे गांधीजींशी मतभेद झाले. म्हणून नेताजींनी ३ मे १९३९ रोजी फॉरवर्ड ब्लॉक नावाचा वेगळा पक्ष स्थापण केला. या पक्षाचे पहिले अधिवेशन २२ जून १९३९ रोजी मुंबई येथे भरले होते. हॉलवेल स्मारक रद्द करण्यासाठी त्यांनी मोर्चा काढला होता. सत्याग्रहही केला होता. म्हणून ब्रिटिश सरकारने त्यांना डिफेन्स ॲक्टखाली २ जुलै १९४० रोजी अटक केली. ते आजारी पडल्यामुळे ५ डिसेंबर १९४० रोजी त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. दिनांक १६ जानेवारी १९४१ रोजी ते नजरकैदेतून पसार झाले आणि गोमाहा-पेशावर-जामरूद-काबूलमार्गे ते रशियात गेले होते. रशियातून नेतीजी ऑस्ट्रियाला गेले. तेथे त्यांनी काही काळ वास्तव केले. त्यानंतर नेताजी जर्मनीला गेले. तेथे त्यांनी जर्मनीचा हुकूमशहा हिटलर याची भेट घेतली. जर्मन आकाशवाणीवरून नेताजींनी भाषण केले व तेथील हिंदी लोकांना साम्राज्यवाद्यांविरूद्ध संघटित होण्याचे आवाहन केले.नेताजी १३ जून १९४३ रोजी जपानला आले त्यांनी रासबिहारी बास यांची भेट घेतली आणि ५ जुलै १९४३ रोजी त्यांनी रासबिहारी बोस यांच्या विनंतीवरून आझाद हिंद सेनेची सुत्रे आपल्या हाती घेतली. जपानचे तत्कालीन पंतप्रधान जनरल टोजो यांनी जपानकडून यद्ध समाप्तीनंतर भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे आश्वासन देले तसेच जनरल टोजो यांनी नेताजी बोस यांना हंगामी सरकार स्थापन करणअयाची सूचना केली होती.

**हंगामी सरकारची स्थापणा (२९ ऑक्टोबर १९२३)**

नेताजींनी २१ ऑक्टोबर १९४३ रोजी जनरल टोजो यांच्या सूचनेनुसार सिंगापूर येथे हिंदूस्तानचे हंगामी सरकार स्थपान केले होते. या सरकारला लगेचच जर्मनी, जपान, इटली इत्यादी राष्ट्रांनी मान्यता दिली होती. आपल्या सेनेचा उत्साह द्विगूणीत करण्यासाठी तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दुंगा अशी घोषना त्यांनी केली. आपल्या सैनिकांना चलो दिल्ली असा संदेश दिला. देशभक्तीने प्रेरित झालेल्या आझाद हिंद सेनेने भारताच्या पूर्व व आग्नेय दिशेकडे आगेचूक केले. अंदमान व निकोबार ही बेटे जिंकून घेतली व त्यांना अनुक्रमे शहीद व स्वराज्य अशी नावे दिली. भारताच्या पूर्वेकडील भाग आझाद हिंद सेनेने जिंकून घेतला होता. ही सेना इंफाळपर्यंत येऊन पोहचली होती. मात्र इंफाळ जिंकता आले नाही. हंगामी सरकारच्या मत्रिमंडळाच्या बैठकित इंग्लंड व अमेरिकेशी रीतसर युद्ध पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नेताजींनी जपानच्या आकाशवाणी केंद्रावरून युद्धघोषणा केली होती. कदम कदम बढाये जा हे समरगीत या फौजेचे होते. नेताजींनी आझाद हिंद फौजेच्या रेजिमेंटला गांधी, नेहरू, आझाद व राणी लक्ष्मीबाई रेजिमेंट अशी नावे दिली होती. राणी लक्ष्मीबाई या महिली रेजिमेंटचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी सहगल यांच्याकडे होते.

**कु. बागूल प्रिया दिलीप**

**टी.वाय.बी.ए.**

*****

आपल्या इतिहासाचे दाखले द्यायचे झाले तर असे आणवते की, पर्यावरणातील घडामेडी या अनेक ठिकाणी संस्कृतीच्या रहासास कारणीभूत ठरू शकतात, नव्हे, तसे अनेकदा घडलेले आहे. विसाव्या शतकाच्या आरंभापूर्वी जागतिक संस्कृतीची संकल्पना अस्तित्वात नव्हती. अनेक संस्कृतींचा उदय आणि ऱ्हास या काळात झाला. युरोपियन समाजव्यावस्थेच्या उदयामुळे परस्परावलंबी संस्कृतीचा उदय झाला आणि मग पर्यावरणातील घडामोडी एका संस्कृतीच्याच नव्हे, तर संपूर्ण मानव जातीच्याच ऱ्हासास कारणीभूत ठरू शकतील, अशी शक्यता निर्माण झाली.

पर्यावरण संरक्षणाच्या बाबतीत अतिशय नाजूक समजल्या जाणाऱ्या अनेक परिसंस्थात जीवसृष्टीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. लोकसंख्येतील अविरत आणि बेसुमार वाढ, तसेच अफाट बुद्धिमत्ता व तंत्रज्ञानातील उत्क्रांतीच्या जोरावर सर्वांगीण विकासासाठी पर्यावरणात वाट्टेल तसे घडवून आणण्याची इच्छाशक्ती -या आणि अशा अनेक गोष्टीमुळे मानवजात आज पूर्वीच्या संस्कृतीप्रमाणेच आपल्या रहासाकडे वाटचाल करीत आहे. त्यामुळे आपल्या जागतिक समाजव्यवस्थेचा पाया ज्या पर्यावरणातील परिस्थितीच्या बदलांवर अवलंबून आहे त्याचा सखोल अभ्यास करणे आज जरूरीचे झाले आहे. त्यातील प्रमुख दिशादर्शक मुद्दे म्हणजे आजघडीला सतत वाढत असलेली लोकसंख्या नैसर्गिक साधनसंपत्ती आणि पर्यावरण यातील होते गेलेले व होत जाणारे बदल अभ्यासणे.

**कु. वळवी मंगला आमशा**

**तृतीय वर्ष कला (भुगोल विभाग)**

*****



गेली काही दशकांमध्ये माणूस निसर्गाशी स्पर्धा करून आर्थिक समृद्धी प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्यामुळे पर्यावरणविषयक अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत.या पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय परिषद झाली होती आणि त्यामध्ये पर्यावरणविषयक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला होता. स्टॉकहोम परिषदेच्या पार्श्वभूमीवर १९७६ मध्ये दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांच्या पुढाकाराने देशाच्या राज्य घटनेत ४२ वी दुरूस्ती करण्यात आली. त्यामध्ये भारताच्या प्रत्येक नागरिकाचे पर्यावरणाचे रक्षण हे मूलभूत कर्तव्य असण्याबाबत राज्य शासनावरिल असणारे बंधन अनुच्छेद ४७-अ मध्ये स्पष्ट करण्यात आहे आहे. या खेरीज अनुच्छेद २१ नुसार स्वच्छ व निरोगी पर्यावरणात जगण्याचा नागरिकंचा अधिकार भारतातील अनेक न्यायालयांनी वेळोवेळी मान्य केलेला आहे त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते असे नाही. कायद्याने ज्या बार्बीवर निर्बंध घातलेले आहेत. त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याबाबतच आग्रही भूमिका घेणे आवश्कता आहे.

आपल्या सभोवताली असणार्या सजीव व निर्जीव घटकांच्या आणि त्यादरण्न होणाऱ्या नैसर्गिक घडामोडी आणि त्यांच्या परिणाम यांना पर्यावरण असे संबोधता येते पर्यावरण म्हणजे केवळ जमिनीचे क्षेत्र नसून त्यामध्ये जमीन, पाणी, हवा, त्यादरम्यानचे सजीव व निर्जीव घटक

यांचा समावेश होतो. पर्यावरणाचे घटक म्हणून वातावरण, जलावरण, भूआवरण आणि जीवावरण अशा चार मुद्यांचा प्रामुख्याने विचार केला जातो.

अशा घटकांचा एकत्रित विचार करताना परिस्थितीकी ही संकल्पना समजून घ्यावी लागते. परिस्थितीकी म्हणजे सजीवांचा परस्परातील व निर्जीव घटकांशी असणारा नियमित अंतरसंबंध होणारा परिसर किंवा जागा होय उदा. एखाद्या डबक्यातील पाण्यात सूक्ष्म जींवापासून बेडूक, माश्यांपर्यंत अनेक जीव वावरत असतात. त्यांना आवश्यक असणारे अन्न तेथे उपलब्ध असते. किंबहुना अशा अन्न घटकांमध्ये एक अन्नसाखळी अस्तित्वात असते. डबक्याच्या सभोवती असणाऱ्या गवत झाडे खडक माती या दरम्यान वावरणारे इतर सजीवसुद्धा त्याचा भाग असतात. जेव्हा या डबक्याचे अस्तित्व नाहीसे होते, तेव्हा तेथील सर्व सजीवांचे अस्तित्वदेखील संपुष्टात येते.

सजीव घटकांमधील प्राणी व वनस्पतींच्या दरम्यान अनेक जनुकीय, प्रजाती-जाती व परिस्थितीकीय असे जैववैविधय वर्गीकरण केले जाते. पर्यावरमामध्ये अशी जैवविधता प्रदेशनिहाय भिन्न आढळते. काही सजीव त्या त्या विशिष्ट प्रदेशातच आढळताता.उदा. पश्चिम घाटात आढळणारे शेकूरू सजीवांची वसतिस्ताने, आढळस्थाने व प्रजनन स्थळे ही त्यांच्या गरजा, सवयी व अनुकूल वातावरणाशी निगडीत असातात. अनेकदा काही सजीवांचे स्थलांतर नियमितपणे होत असते. त्यामुध्ये स्थानिक पातळीपासून आंतरखंडीय स्थलांतर करणारे प्राणी, पक्षी मासे आढळतात.त्यामुळे प्रत्येक परिस्थितीकी ही पर्यावरणीयदृष्ट्या महत्वाची असते. अशा जैवविविधतेची संपन्नता जपणे आवश्यक आहे.

मानवी लोकसंख्येच्या वाढीमुळे आणि मानवाच्या बदलत्या जीवनशैलीमुळे पर्यावरणाचा रहास होतो व बाधा पोहोचते. मात्र लोकसंख्येच्या संध्याच्या प्रमाणात उपलब्ध असलेली नैसर्गिक साधन संपती पुरेशी आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. नैसर्गिक साधन संपत्तीचे योग्य प्रकारे वापर व नियोजन केल्यास सर्व लोकसंख्या स्वतः ची गरज सहज भागवू शकते मात्र बदलेली जीवनशैली, संसाधनांची हाव, संसाथनाचा अतिवापर, गैरवापर संसाधनाचे शोषण वापरा आणि टाकून द्या संस्कृती, यामुळे सध्या पर्यावरणीय गंभीर समस्या उभ्या राहिल्या आहेत. काही प्रमाणात पर्यावरणाची न भरून येणारी हानी झाली आहे. प्लास्टिकचा वापर, रसायनांचा वाढता वापर कचरा निर्मिती हवा -पाणी-जमीन -अवाज-प्रकाश आदीचे प्रदूषण हे मानव निर्मित असून, पर्यावरणीय समस्यांचे कारण आहे, तसेच स्वतः ची पर्यावरण संवर्धन व सरंक्षण विषयक जामीव आणि कायद्याचे अज्ञान व अनुपालन करण्याची अनिच्छा ही करणे अशा समस्या अधिक बळकट करतात.

भारताच्या संविधानाने जसे प्रत्येक नागरिकाला अधिकार दिले आहेत, विशेषत कलम २१प्रमाणे दिलेला जगण्याचा अधिकार यामध्ये त्याच्या गरजा भागवण्याबरोबरच स्वास्थापूर्ण जीवन जगण्याचा हक्क व अधिकार अंतर्भुत आहे. त्याबरोबर इतरही हक्क मिळणे अभिप्रेत आहे. मात्र कलम५१ च प्रमाणे दिलेली मुलभूत कर्तव्ये पार पडणे ही संविधानिक जबाबदारी आहे हे लक्षात घेतले पाहिजे यामध्ये (क) संविधानाचे पालन करण, (छ) असण्ये , सरोवरे नद्या व वन्यजीवसृष्टी यासुद्धा नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे, (ज) विज्ञाननिष्ठ द्रष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद याचा विकास करणे, अश्या मूलभूत कर्तव्यांचे पालन करताना संविधानावर आधारित सर्व कायद्यांचे पालन करणे हे आवश्यक आहे आणि हाच पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा मार्ग आहे.

**पवार पनिलाल राजेंद्र**

**तृतीय वर्ष कला**

*****



राज्यात प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे, याची सरकार खरोखरच गंभीर दाखल घेत की नाही याबद्दल संदेह वाटतो. कारण वाढते प्रदूषण कमी व्हावे म्हणून ठोस अशी उपायोजना अजून तरी कार्यवाहीत आलेली नाही. राज्यातील खाणी बंद झाल्यो खनिजवाहू वाहनांची वाहतूक बंद पडली . त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण कमी झ ाले आहे. हे खरे असले तरी वाढत्या प्रदूषणाला आणखी किती तरी बाबी जवाबदार आहेत, त्याची दखल घेऊन उपाययोजना व्हायला हवी, त्याकरीता एखादी अफलातून कल्पना करून ती प्रत्याक्षात उतरविण्याचा विचार केला किंवा प्रख्यात तरी त्याचा परिणाम शून्यपेक्षा अधिक असेल असे वाटत नाही.

हे सर्व प्रकर्षाने जाणवण्याचे कारण म्हणजे राज्याच्या पर्यावरण व वन मंत्री श्रीमती एलिना साल्ढाणा यांनी एक अफलातून योजना राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे. सायकल वाहतुकीसाठी वेगळे रस्ते तयार करून मोटर वाहन वाहतुकीचे प्रमाण कमी करण्याचा त्यांचा मानस आहे. सायकल वाहतुकीसाठी वेगळे रस्ते योजना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडणार असल्याचे त्यांनी बोलून दाखविले आहे.

सायकल चालविण्याचा व्यायाम हा आरोग्य संवर्धक आहे. ह्रदयरोग व अन्य काही रोगांवर नियंत्रण ठेवण्यास सायकलिंग हा उत्तम उपाय असल्याचे त्यांचे म्हणणे गैर नाही. कारण चालणे नि पोहणे ह्यांतून जो व्यायाम होतो त्यापेक्षाही जास्त सायकलिंगमुळे होतो ह्या गोष्टीत तज्ज्ञांचाही दुजोरा आहे. पन्नाशी उलटल्यावर अतिरक्तदाब, ह्रदयरोग, मधुमेह यांसारख्या व्याधी जडण्याचा धोका हल्ली कालमानानुरूप वाढला आहे. वयोवृद्ध मंडळी चालण्याचा व्यायाम करू शकतात. पोहण्याची शक्ती असती नि व्यायाम केला असता तर त्यांना रोग जडले नसते. पर्यावरणमंत्री एलिना साल्ढाणा यांच्या मतानुसार तरूण, युवक, कर्मचारी आदींनी दुचाकी-चारचाकी वाहनाऐवजी नोकरी-धंद्यावर , कामावर जाण्यासठी सायकलींचा वापर केल्यास वाढते प्रदूषण कमी होईल. कल्पना फारच छान आहे. पण पत्यक्षात येण्यास किंवा आणण्यास कठीन आहे, त्याला अनेक कारणे आहेत.

पर्यावरणमंत्री एलिना हल्लीच चीनला भेट देऊन परतल्याने तेथील मध्यम इतर वर्गीय लोकांकडून होणाऱ्या सायकलवाहतुकीच्या पसंतीने प्रभावित झाल्या आहेत. पण चीनमध्ये अशी परिस्तिती आढळल्यास तशीच कारणे आहेत. चीनमध्ये गेली पन्नास वर्षे कम्युनिस्ट राजवट होती. शिवाय तेथील आर्थिक परिस्तिती वेगळी होती. वैयक्तिक संपती गोळा करण्यावर बंधने होती. चीनने आपली उत्पादन क्षमता वाढविली नि आज जगातील अनेक देशांत आपल्या माल-वस्तूंसाठी बाजारपेठ मिळविली . आज चीनमधीलही परिस्तिती बदलत चालली आहे. पूर्वी तिथे चैनी वस्तू खरदी करण्यावर बंदीच होती म्हणा. पण आज तेथील लोकही मोटरसायकल किंवा कार स्वत साठी विकत घेऊ शकतात. कित्येक दशके कम्युनिस्ट राजवटीखाली दबल्या तेथील जनतेला स्वत च्या गरजा भागवून आपली जीवनशैली व दर्जा इच्छेनुसार घडविण्याचे भाग्य प्राप्त झाल आहे. आज चीनमध्ये सायकल चालविण्याची रूढी म्हणा किंवा जबरदस्तीतून जडलेली सवय म्हणा, ही प्रकार होत चालता आहे. आणखी काही येत्या वर्षात चीनमध्येही सायकलीचे राज्य जाऊन मोटरीचे राज्य येईल हेही ध्यानात घ्यावयास हवे. बदलती परिस्थिती नि काळ यानुसार मनुष्याचा जीवनशैली दर्जात बदल, सुधारणा ह्या गोष्टी आपसूक घडायच्याच म्हणून ह्या पार्श्वभमीवर

पर्यावरणमंत्री एलिना साल्ढाना ह्यांनी सखोल विचार करण्याची अत्याश्वकता आहे. राज्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी वाहनांची संख्या कमी करा, मोटरसायकल किंवा कार ऐवजी सायकलींच वापर करा असा सल्ला देण्याचा नैतिक अधिकार राज्यांतील मंत्र्यांना आहेच कुठे मुळी! अहो, बेसुमार भूउत्खननला कोणी परवानगी दिली? खनिज वाहतूकीमुळे होणाऱ्या प्रदूषणाने जनारोग्य बिघडले त्यावेळी मंत्र्यानी हे प्रकार कसे खपवून घेतले?

लोकांना सायकली वापरा म्हणून सांगू इच्छिणाऱ्या मंत्र्यांनी अत्यावश्याकता सोडून अन्यत्र सायकलस्वार बनुन नवा आदर्श पायंडा घालून द्यावा! जनता जनार्दन त्यांचे कल्याण चिंतेल! मंत्र्यांसाठी अधिकार्यांसाठी किती वाहने दिमतीला (गरजेपेक्षा जास्त) आहेत, वर्षाकाठी इंधानावर किती पैसा उधळला जातो त्याचा लेखा-जोखा जाहीर करावा. मंत्र्यांचे फोटो, त्यांच्या कार्यक्रमांची वृत्ते प्रसिद्ध करून घेण्यासाठी प्रसिद्धी खात्यावर किती खर्च नि पैशांची उधपट्टी?

रसकारी वाहने प्रदूषन विरहित बनविली आहेत काय? राज्यांतील वाहनांची संख्या लोकसंख्येच्या ५० ते ६० टक्के एवढी आहे. पण ही वाहनसंख्या वाढवण्यास कोण जबाबदार? आज राज्यातील सार्वजनिक बस वाहतूक सेवा कोलमडली आहे, अपुरी आहे, गैरसोयीची आहे. त्यामुळे नोकर, कर्मचारी, अधिकारी, खाजगी आस्थापनांतील नोकरवर्ग स्वतःच्या दुचाकी वापरणे पंसत करतात. कारण कामावर वेळेवर पोहचण्यासाठी ते सार्वजनिक वाहतूक सेवेवर अवलंबून राहू शकत नाही. नोकऱ्या, कामधंदे सारे शहराकडे असल्याने गावांपासून जी शहरे ८-१० किलोमीटर अंतरावर आहेत तिथे कामावर वेळेत कसे पोहचणार? म्हणून बँक कर्ज काढून देखील दुचाकी खरेदी करून नोकरदार आपली स्वतंत्र व्यावस्था करून घेतो कारण ते क्रमप्राप्त आहे. त्याशिवाय गत्यंतर नाही. गावातून लघू उद्योग, कारखाने, मिनी-मार्केट काहीच सोयीसुविधा अजून उपलब्ध झालेल्या नाहीत. अपवाद फक्त शिक्षण सुविधा!

राज्यात एकून प्रवासी संख्या किती आहे? त्या तुलनेत वाहतूक सेवा पुरेशी आहे का ? त्याचा शोध घेऊन उपाययोजना झालेली नाही. म्हणून मोटरसायकली, कार आदी वाहनांऐवजी सायकली चालविण्याचा पर्यावरणामंत्र्याच्या सल्ला बूमरॅग होईल!

प्रदूषण वाढनये म्हणून उपाय हवेत, त्याचबरोबर पर्यावरण रक्षण नि संवर्धनही व्हायला हवे. पर्यावरणाचे रक्षण होण्याऐवजी गेली दोन दशके त्याचा मोठ्या प्रमाणात रहास झाला. जलसंपत्ती नि वनसंपत्तीचे रक्षण करण्यास राज्य सरकार अपयशी ठरले हे सत्य मान्य करायेच लागेल. कारण त्याचे दुष्परिणाम आज गोमंतकीय जनता प्रत्यक्ष डोळ्यानीं बघतच नाही तर भोगते आहे. आलिशान बंगल्यात वास्तव्य करून वाताकूलित चेंबरमध्ये बसून नि वातानुकूलित खासस गाडीतून दौरे-भेटी करण्यास मंत्र्याना सायकल वापर सल्ले देणे अगदी सोपे आहे. भरदुपारी, रखरत्या उन्हांत रस्त्यावर पायी चालणाऱ्या काय दाह सहन करावा लागतो याचा एकवार अनुभव घ्या रस्त्यांच्या बाजूला असलेल्या झाडांची कत्तल झाली, रस्ते रूंद झाले, पण त्या रूंद रस्त्याच्या बाजूना न रोपटे नि झाड! हे कसले पर्यावरण रक्षण नि संवर्धन?

वनसंपपत्ती नष्ट झाली. वनराई दिसणे कठीण! उघडे-नागडे डोंगर! परिस्थितीत अन्न-पाणी-निवारा यासाठी वन्य प्राण्यांनी मानवी वस्तीवर अतिक्रमण केले तर त्यात त्यांचा काय दोष किंवा गुन्हा! तरी वरे अजून पकडलेल्या जीवांवर गुन्हे दाखल केले जात नाही!

**सुर्यवंशी दिपक बाबुलाल**

**द्वितीय वर्ष कला**

*****



जनकवि बाबा नागार्जुन एक विराट व्याभ्तित्व के स्वामी थे। बाबा केलव हिंदी के ही नही वरन मिथिला एवं संस्कृत के भी अच्छे कवि थे। उनकी कविताओं मे जनचेतना एवं ग्रामीण जीवन की स्पष्ट झलक मिलती है। जीवनभर आर्थिक विपन्नता से सराबोर नागार्जुन ने जीवन को भी खुल जीया। पुरे ८७ वर्षो तक अभावों से भरे पटे बाबा चाहे जब भी क्रांती की चिंगारी उडी, परिवर्तन का समय आया बाबा उसमें शामिल होते रहे। किसानों की बिरादरी चाहे जब और जहाँ जमी बाबा हाजिर। ऐसे थे झोलाधारी बाबा नागार्जुन। उनकी 'उनको प्रणाम', 'मंत्र कविता', 'गुलाबी चुडियां', 'नेवला', 'शासन की बंदुक', 'अकाल और उसके बाद', 'बहुत दिनों बाद' आदि कविताएँ समाज, सत्ता और मानव जीवन के विविध पहलुओ तथा उनमें व्याप्त विसंगतियो से साक्षात्कार कराती है। उनकी कविताओं में भारतीय समाज की आत्मा विद्यमान है। संपूर्ण भारतीय समाज उनका सदैव ऋणी रहेगा। बाबा का वह घुमक्कडपन, यायावरी जीवन सदैव मुखरित होगा। साथ ही उनकी रचना से गरीब, शोषित, असहाय जीवन को स्वर मिलेगा। बाबा आधुनिक युग के कबीर थे।

उनमें निम्न मध्यर्गीय समाज के जीवन में घुल-मिल जाने की क्षमता भी थी। नागार्जुन पुराने सडे हुये समाज के कुंभीपाक को समाप्त कर देना चाहते थे और नये समाज की रचना करना चाहते थे। उनमें समाजवाद के प्रती बौद्धीक लगाव ही नही हार्दिकता भी थी। उनके प्रत्येक उपन्यास में नये समाज की आकांक्षा और उसकी प्रतिष्ठा का संकेत मिलता है।

अपने इस साहित्यिक योगदान के लिए उन्हें साहित्यीक अकादमी पुरस्कार के साथ ही उत्तरप्रदेश सरकार का 'भारत-भारती', मध्यप्रदेश सरकार का 'मैथिलीशरण गुप्त' और 'कबीर सम्मान' तथा बिहार सरकार द्वारा 'राजेंद्र शिखर' सम्मान से सम्मानित किया गया।

जन-जन की भाषा में जन-जन की पीडा को बयान करनेवाला एक प्रखर चिंतक साहित्यिक बाबा का लंबी बिमारी के बाद ५ नवंबर १९९८ को लहरिया सराय मे निधन हो गया। उन्हें खोने का मलाल तो हमें सदा रहेगा ही। बाबा की करूणाई, उनकी सौदर्यदृष्टि, अजिबोगरीब सामजिक चेतना आदि के दर्शन अब कहाँ हो पायेंगे। हम सब की ओर से महान जनकवि को विनम्र श्रध्दांजली। उनकी कविता बहुत दिनों कें बाद की कुछ पंक्तियाँ है उनकी याद में-

"बहुत दिनो के बाद, अब की मैने जी भर भोगे, गंध, रूप, रस-शब्द स्पर्श सब साथ-साथ इस भु-पर, बहुत दिनो के बाद।

**कु. मोहने इर्षाली मोहन**

**एस.वाय.बी.ए (हिंन्दी विभाग)**

*****




संपूर्ण विश्व की तुलना में भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ मानी जाती है। जिस में दान का एक अपना महत्व समझा जाता है। अब चाहे कन्यादान हो या रक्तदान, जो भी दान हो किसी के खातीर किया गया अर्पग कहलाता है। उसमे रक्तदान की माहिमा अपरंपार है क्योंकी रक्तदान ही जीवनदान है।

यदि किसीको हम जीवनदान दे सके, इससे बढकर सुखद कल्पना जीवन में कोई हो ही नही सकती और इसकी अनुभूती सक्तदान करके महसूस की जा सकती है। अपने इस समाज के लिए त्याग, कुछ कर दिखाने की भावना हममें होनी चाहिए। रक्तदान से यह भावना अक्सर प्रेरित होती है। इसलिए रक्तदान ही इस युग का वास्तविक जीवनदान है, सर्वोत्तम शक्तिमान है।

इन्सान के निरोगी शरीर में लगभग ५ लीटर खुन की मात्रा होती है। एक बार रक्तदान की प्रक्रिया से ३५० मि.ली. खुन का निर्गमन किया जाता है। कुछ ही दिनों में खुन की मात्रा यथावत हो जाती है। रक्तदान से किसी रोगी को जीवनदान मिलता है। उसके बहुमुल्य प्राणो की रक्षा होती है।

रक्तदान की सुलभ प्राक्रिया पर आजकल विशेष ध्यान दिया जा रहा है। ताकि किसी भी व्यक्ती को कोई असुविधा या संकोच न हो। ताकि इस महादान से वह कदापी कतराये नहीं। ऐसे रक्तदान शिबीर का आयोजन शासन या लोकसंस्था हर वर्ष करते है ताकि इन्सान को कुछ देने की प्रेरणा से रोगी को जीवनदान मिले। समाज में कुछ ऐसे व्याक्ती दृष्टिगोचर होते है जो किसी निर्धारित समय पर ही रक्तदान करते है। जैसे कोई जन्म दिन के अवसर पर, शादी की सालगिरह पर या किसी के स्मृतिदिन पर वह अनोखा दान करके अपने जीवन में सुख का आनंद लेते हुये वह जीवन जीते है।

रक्तदान के लिए शरीर का निरोगी होना अत्यावश्यक है। वरना रोगी को मुसीबत का सामना करना पड सकता है। कई माध्यामों से सरकार जनता की भावनाओं को जागृत कर रही है।

आज के इस विज्ञान युग में मानव का हर अवयव कृत्रीम बनाया जा रहा है ताकि अवयव खराब होने पर उनका इस्तमाल हो सके, जिसके आधारपर इन्सान अपनी अगली जिंदगी चैन से जी सके। लेकीन इस युग में रक्त का निर्माण संभव नही हो सकता क्योंकी यह सजीव है, निसर्ग निर्मित है। आज जिंदगी में किसी दौर (मकाम) पर कुछ हो जाये कहा नहीं जा सकता, इसलिए रक्तदान करनेसे आनेवाली विपदा को हम कुछ मात्रा में टाल सकते है। हर मानव ने आज रक्तदान का संकल्प मात्रा में टाल सकते है। हर मानव ने आज रक्तदान का संकल्प करना चाहिए। अपने परिवार के सदस्यों का रक्तदान करने के लिए प्रेरीत करना चाहिए।

रक्तदान ही जीवनदान है, आशा की किरण है जिसके सहारे रोगी को अंधियारे जीवन में दो कदम आगे बढकर जीवन जीने की रोशनी मिलती है। इसलिए आज प्रत्येक व्यक्ति रक्तदान करके दूसरों को जीवनदान दे प्राण दान है यही कामना, यही आशा ।

**कु. मोहने मिना हेमंत**
**एस.वाय.बी.ए. (हिंन्दी विभाग)**

*****

## रंग पाण्याचे

नयनामध्ये येता पाणी
अश्रू तयाला म्हणती,
कधी सुखाचे, कधी दु खाचे,
अशी तयांची महती...!
चटकदार तो पदार्थ दिसता,
तेंडाला या पाणी सुटते,
खाता खाता ठसका लागून
डोळ्यांतून मग पाणी येत..!
धनाढयाघरी लक्ष्मी देवी,
म्हणती अविरत भरते पाणी..
ताकदीहूनी वित्त खर्चिता
